

नववर्षात मोदी सरकारची
**शेतकऱ्यांना भेट**

पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 7 । अंक: 1 । 1 जानेवारी, 2025 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# संविधान परमो धर्मः



## अध्यक्षीय मनोगत

# संविधानाचा उपासक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, संविधान हा त्यांच्यासाठी धर्मग्रंथ आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचे मा. मोदीजी हे सच्चे उपासक आहेत. देशाच्या संविधानाला ६० वर्षे पूर्ण झाली त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री असलेल्या मोदीजींनी हत्तीवर संविधान प्रत ठेऊन सन्मानाने मिरवणूक काढली होती त्यात ते स्वतः पायी चालत होते. देशामध्ये संविधान दिवस साजरा करण्यास त्यांच्याच सरकारने सुरूवात केली. देशात संविधान लागू झाले त्याला यंदा २०२५ साली ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यंदाच्या प्रजासत्ताक दिनाचे वेगळे महत्त्व आहे. मोदीजींनी संविधानाने सर्वसामान्य माणसाला दिलेल्या मूलभूत अधिकारांचा सदैव सन्मान केला. देशात सर्वत्र संविधान लागू असले पाहिजे यासाठी मोदीजींनी ऐतिहासिक काम केले. काँग्रेस सरकारने काश्मीरमध्ये ३७० वे कलम लागू केल्यामुळे जम्मू आणि काश्मीरमध्ये भारताचे संविधान लागू होत नव्हते तर त्या राज्याचे स्वतःचे स्वतंत्र संविधान होते. याच्या विरोधात जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सत्याग्रह केला व ते हुतात्मा झाले. 'एक देश मे दो विधान, दो निशान, दो प्रधान, नही चलेंगे,' अशी त्यांची घोषणा होती. जनसंघ व नंतर भारतीय जनता पार्टीने घटनेचे ३७० कलम हटविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. भाजपाला जनादेश मिळाल्यानंतर २०१९ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मोठ्या हिंमतीने घटनेतील कलम ३७० हटविले. अखेर जम्मू आणि काश्मीरमध्येही भारताचे संविधान पूर्णपणे लागू झाले. तेथील नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार मिळाले तसेच दलित व मागासांना आरक्षणाचा पूर्ण लाभ झाला. मोदीजींनी आणि भारतीय जनता पार्टीने सदैव संविधानाचा आदर केला असताना काँग्रेसने मात्र सदैव संविधानाचा आणि संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला. देशावर आणीबाणी लादून काँग्रेसने त्या काळात संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवरही घाला घातला. 'मनोगत'च्या या अंकात काँग्रेसने संविधानाचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कसा अपमान केला याविषयी लेख आहेत, ते अवश्य वाचावेत. नेशन फर्स्ट म्हणणारी भाजपा देशाच्या संविधानाचा पूर्ण आदर करते. पक्षाच्या विचारधारेशी समाजातील विविध घटकांना जोडून घेण्यासाठी सध्या देशभर पक्षाचे संघटन पर्व चालू आहे. या कालावधीत सदस्यता अभियान गतीने सुरू आहे. प्रत्येक बूथमध्ये आणि समाजाच्या सर्व घटकांमध्ये पक्षाचे सदस्य जोडून आपल्याला भाजपाला पुन्हा एकदा सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी पक्ष बनवायचे आहे. नियमितपणे सदस्यता अभियान, सक्रीय सदस्य नोंदणी, पक्षांतर्गत निवडणुका अशी लोकशाही प्रक्रिया पक्षामध्ये प्रामाणिकपणे पाळणारा भाजपा हा एकमेव राजकीय पक्ष आहे, याचा मला अभिमान वाटतो. नवे इंग्रजी वर्ष सुरू झाले आहे. सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. या वर्षात संघटन पर्व यशस्वी करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपाला पुन्हा एकदा पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनविणे आणि आपल्या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविणे ही महत्त्वाची कामे करायची आहेत.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

काँग्रेसने संविधानाचा अनेकदा गळा घोटला ..... ०४



विधायक मतभिन्नता हवी! ..... ०८



डॉ. आंबेडकरांचा अवमान करणा-या काँग्रेसनेच माफी मागावी ..... ११



घटनेची सर्वाधिक मोडतोड नेहरु-गांधी खानदान व काँग्रेसनेच केली ..... १४



पंडित नेहरुंनी माझ्यावर कायम अन्याय केला ..... १७



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतून जनतेचा स्पष्ट संदेश ..... २३



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# काँग्रेसने संविधानाचा अनेकदा गळा घोटला



भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संसदेत झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.

**आपणा** सर्वांसाठी आणि सर्व देशवासीयांसाठी इतकेच नव्हे तर जगभरातल्या लोकशाहीप्रेमी नागरिकांसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे. लोकशाहीचा हा उत्सव मोठ्या अभिमानाने साजरा करण्याची ही वेळ आहे. संविधानाचा ७५ वर्षांचा अविस्मरणीय प्रवास आणि जगातल्या सर्वात महान आणि विशाल लोकशाहीचा प्रवास, यामागे असलेली आपल्या संविधान निर्मात्यांची दूर दृष्टी, आपल्या संविधान निर्मात्यांचे योगदान घेऊन आपण आज आगेकूच करत आहोत. अमृत महोत्सवानिमित्त उत्सव साजरा करण्याचा हा क्षण आहे. संसदही या उत्सवात सहभागी होऊन आपल्या भावना व्यक्त करत आहे याचा मला आनंद आहे. संविधान निर्माते या बाबतीत अतिशय सजग होते. भारताचा जन्म १९४७ मध्ये झाला, भारतात १९५० पासून लोकशाही आली असे ते मानत नव्हते, ते मानत होते इथल्या महान परंपरा,महान संस्कृती, महान वारसा, हजारो वर्षांच्या या प्रवासाप्रती ते सजग होते, या सर्व बाबी त्यांच्या ध्यानी होत्या. भारताची लोकशाही, भारताचा प्रजासत्ताक भूतकाळ अतिशय समृद्ध राहिला आहे. जगासाठी प्रेरक राहिला आहे आणि म्हणूनच लोकशाहीची जननी म्हणून आज भारत ओळखला जात आहे. आपण केवळ विशाल लोकशाही आहोत इतकेच नव्हे तर आपण लोकशाहीची जननी आहोत.

आपल्या संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत आपल्या देशाच्या नारी शक्तीने संविधानाला सशक्त करण्यात मोठी भूमिका निभावली होती. संविधान सभेत १५ माननीय महिला सदस्य होत्या आणि सक्रिय सदस्य होत्या. सखोल चिंतनाच्या आधारे त्यांनी संविधान सभेची चर्चा समृद्ध केली. या सर्व भगिनी वेगवेगळ्या भागातल्या, वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरच्या होत्या. संविधानासाठी त्यांनी ज्या सूचना दिल्या, त्यांचा संविधान निर्मितीवर मोठा प्रभाव राहिला. जगातले अनेक देश स्वतंत्र झाले, संविधाने तयार झाली, लोकशाहीही आली मात्र महिलांना अधिकार देण्यासाठी दशके लोटली. मात्र आपल्या इथे सुरवातीपासूनच संविधानात महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला

आहे. आपण संविधानाची ७५ वर्षे साजरी करत असताना आज आपण पाहतो की प्रत्येक मोठ्या योजनेच्या केंद्रस्थानी महिला असतात. हा योगायोग आहे आणि चांगला योगायोग आहे की भारताच्या राष्ट्रपती पदी एक आदिवासी महिला विराजमान आहे. ही आपल्या संविधानाच्या भावनेचीही अभिव्यक्ती आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी असा इशारा दिला होता... पहा मी त्यांचेच उद्गार उद्धृत करतो... बाबासाहेब म्हणाले होते, देशाच्या वेगवेगळ्या भागातल्या लोकांच्या ज्या वेगवेगळ्या भावना आहेत, त्यांना एका सूत्रात कसं बांधायचं हा खरा प्रश्न आहे. देशातल्या जनतेमध्ये एकतेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना एकमेकांच्या साथीनं निर्णय घेण्यासाठी प्रेरित कसं करायचं ही समस्या आहे.

विविधतेचा हा आपला अमूल्य ठेवा जपण्याऐवजी ते देशाच्या एकतेला नख लावण्यासाठी, विविधतेत भेदाभेदाचं विष पसरवण्याचा प्रयत्न करू लागले. कलम ३७० देशाच्या एकतेला बाधा आणत होतं, एकतेच्या मार्गातला अडथळा ठरलं होतं. राज्यघटनेतून व्यक्त झालेल्या देशाच्या एकतेच्या भावनेलाच आम्ही प्राधान्य दिलं, देत आहोत. म्हणूनच आम्ही कलम ३७० हटवलं, कारण देशाचे ऐक्य हेच आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचं आहे.

युग बदलले आहे आणि डिजिटल क्षेत्रात आहे रे आणि नाही रे अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, असे आम्हाला वाटते. त्याचप्रमाणे देशासाठी आणि म्हणूनच जगभरात, आम्ही मोठ्या अभिमानाने सांगतो की भारताची डिजिटल इंडियाची जी यशोगाथा आहे, याचे एक कारण म्हणजे आपण तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याचाच एक भाग म्हणजे आपल्या संविधान निर्मात्यांनी आपल्याला दिशा दाखवली आहे. तसेच, भारताच्या प्रत्येक पंचायतीपर्यंत ऑप्टिकल फायबर नेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे जेणेकरून भारताची एकता मजबूत करण्यासाठी आपल्याला बळ मिळेल.

देशाच्या राज्यघटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना संवैधानिक प्रक्रियेतून मला मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे आणि ज्यावेळी मी मुख्यमंत्री होतो त्याचं कार्यकाळात राज्यघटनेला ६० वर्षे पूर्ण झाली आणि मग मुख्यमंत्री म्हणून मी ठरवले की राज्यघटनेची ६० वर्षे आपण गुजरातमध्ये साजरी करूया आणि इतिहासात पहिल्यांदाच असे घडले की संविधानाचा ग्रंथ हत्तीवर सजवलेल्या अंबारीत ठेवण्यात आला होता, विशेष बंदोबस्तात तो ठेवण्यात आला होता. हत्तीवरून संविधान गौरव यात्रा काढण्यात आली आणि राज्याचे मुख्यमंत्री त्या संविधानाच्या तळाशी हत्तीच्या बाजूने पायी चालत निघाले होते आणि देशाला संविधानाचे महत्व समजावून सांगण्याचा प्रतिकात्मक प्रयत्न करत होते.

मला आज इथे कोणावरही वैयक्तिक टीका करायची नाही पण वस्तुस्थिती देशासमोर मांडणे महत्वाचे आहे. त्यामुळे मला वस्तुस्थिती मांडायची आहे. काँग्रेसच्या एका

## समान नागरी कायदा लागू करणार

**एक ज्वलंत विषय आहे ज्याची मला चर्चा करायची आहे आणि तो ज्वलंत विषय आहे समान नागरिक संहिता. विषयाकडे देखील संविधान सभेने दुर्लक्ष केलेले नाही. संविधान सभेने समान नागरी कायद्याबाबत दीर्घ चर्चा केली, आणि चर्चेनंतर निर्णय दिला की जे कुठले सरकार निवडून येईल, त्याने याचा निर्णय घ्यायचा आणि देशात समान नागरिक संहिता लागू करायची. हा संविधान सभेचा आदेश होता. ज्या लोकांना संविधान समजत नाही, देशाला समजून घेत नाहीत, सत्तेच्या लालसेव्यतिरिक्त काहीही वाचलेले नाही. त्यांना माहित नाही बाबासाहेब काय म्हणाले होते. बाबासाहेब म्हणाले होते हे धार्मिक आधारावर व्हावे. हे मी बाबासाहेबांचे सांगत आहे. हा एवढा व्हिडिओ कापून सगळीकडे फिरवू नका! बाबासाहेब म्हणाले होते, धार्मिक आधारावर व्हावे, वैयक्तिक कायदे रद्द करावेत या मताचे बाबासाहेब हे खंदे पुरस्कर्ते होते. त्यावेळचे सदस्य के.एम. मुन्शी, म्हणाले होते, राष्ट्रीय एकात्मता आणि आधुनिकतेसाठी समान नागरी संहिता अनिवार्य आहे सर्वोच्च न्यायालयाने देखील वारंवार म्हटले आहे देशात समान नागरी कायदा लवकरात लवकर लागू व्हायला हवा आणि सरकारांना सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत आणि त्याच संविधानाची भावना लक्षात घेऊन, संविधान निर्मात्यांच्या भावना लक्षात घेऊन, आम्ही पूर्ण ताकदीने धर्मनिरपेक्ष नागरी संहितेसाठी काम करत आहोत.**

कुटुंबाने संविधानाला धक्का देण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. आणि मी या कुटुंबाचा उल्लेख करतो कारण आपल्या ७५ वर्षांच्या प्रवासात एकाच कुटुंबाने ५५ वर्षे राज्य केले आहे. त्यामुळे काय झाले हे जाणून घेण्याचा अधिकार देशाला आहे आणि या घराण्याच्या दुष्ट विचारांची, वाईट रितींची आणि वाईट नीतीची परंपरा सुरूच आहे. या कुटुंबाने राज्यघटनेला प्रत्येक स्तरावर आव्हान दिले आहे.

१९४७ ते १९५२ या काळात या देशात निवडून आलेले सरकार नव्हते, ती तात्पुरती व्यवस्था होती, सिलेक्टेड सरकार होते आणि निवडणुका झाल्या नव्हत्या आणि जोपर्यंत निवडणुका होत नाहीत, तोपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून काही आराखडा तयार करणे गरजेचे होते, तो तयार करण्यात आला. १९५२ पूर्वी राज्यसभेची स्थापनासुद्धा झाली नव्हती. राज्यांमध्ये सुद्धा निवडणुका झाल्या नव्हत्या. जनतेचा कोणताही आदेश नव्हता. असे असतानासुद्धा संविधान निर्मात्यांनी विचारमंथन करून राज्यघटना तयार केली. १९५१ साली निवडून आलेले सरकार नव्हते. त्यांनी अध्यादेश काढून राज्यघटना बदलली आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला आणि तो सुद्धा संविधान निर्मात्याचा अपमान होता, कारण अशा गोष्टी संविधान सभेसमोर आल्याच नसतील, असे नाही. पण तिथे त्यांचे काही चालले नाही, त्यामुळे नंतर संधी मिळताच त्यांनी या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाव घातला आणि हा संविधान निर्मात्याचा घोर अपमान आहे. देशाच्या पहिल्या पंतप्रधानांनी जे बीज पेरले होते, त्या बीजाला खतपाणी घालण्याचे काम दुसऱ्या पंतप्रधानांनी केले, त्यांचे नाव होते श्रीमती इंदिरा गांधी. पहिले पंतप्रधान जी पापे करून गेले, तेव्हाच त्यांच्या तोंडाला रक्ताची चव लागली होती. १९७१ साली सर्वोच्च न्यायालयाचा एक निर्णय आला होता.

सर्वोच्च न्यायालयाचा तो निर्णय राज्यघटनेत बदल करून बदलण्यात आला आणि १९७१ साली ही घटनादुरुस्ती करण्यात आली. इतकेच काय, तर त्यांनी आपल्या देशाच्या न्यायालयाचेही पंख छाटले होते आणि असे म्हटले होते की राज्यघटनेच्या कोणत्याही कलमात संसद वाट्टेल ते प्रयोग करू शकते आणि न्यायालय त्याकडे पाहूसुद्धा शकत नाही. न्यायालयाचे सर्व अधिकार काढून घेतले होते. हे पाप तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७१ साली केले होते. आणि या बदलामुळे इंदिराजींच्या सरकारला मूलभूत अधिकार काढून घेण्याचा आणि न्यायव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मिळाला होता.

सत्तेची चव त्यांना कळली होती आणि त्यांना अडवणारे कोणीही नव्हते आणि म्हणूनच इंदिराजींनी बेकायदेशीरपणे आणि घटनाविरोधी पद्धतीने निवडणूक लढवल्यामुळे न्यायालयाने त्यांची निवडणूक रद्द ठरवली आणि त्यांना खासदारपद सोडावे लागले तेव्हा त्यांनी रागाच्या भरात देशावर आणीबाणी लादली, आपली खुर्ची वाचवण्यासाठी आणीबाणी लादली. इतकेच नाही तर राज्यघटनेचा गैरवापर केला आणि भारतातील लोकशाहीची गळचेपी केली. १९७५ साली त्यांनी ३९ वी घटनादुरुस्ती झाली आणि त्यात त्यांनी काय केले, तर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, अध्यक्ष यांच्या निवडीविरोधात कोणीही न्यायालयात जाऊ शकत नाही, अशी तरतूद केली आणि तेही पूर्वलक्षी प्रभावाने केले. केवळ भविष्यासाठीच नाही तर भूतकाळातील आपल्या पापांसाठीही त्यांनी तरतूद केली.

आणीबाणीच्या काळात लोकांचे हक्क हिरावून घेतले गेले. देशातील हजारो लोकांना तुरुंगात टाकण्यात आले. न्यायव्यवस्थेची गळचेपी करण्यात आली. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याची टाळबंदी करण्यात आली. इतकेच नाही तर त्यांनी वचनबद्ध न्यायपालिका या कल्पनेलाही पाठबळ दिले. इतकेच नाही तर न्यायमूर्ती एच. आर. खन्ना यांनी त्यांच्या निवडणुकीच्या वेळी त्यांच्या विरोधात दिलेल्या निकालामुळे त्या इतक्या संतप्त झाल्या की जेव्हा ज्येष्ठतेच्या आधारावर न्यायमूर्ती एच. आर. खन्ना हे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश होणार होते, ज्यांनी संविधानाचा आदर केला होता आणि त्याच भावनेतून इंदिराजींना त्यांनी शिक्षा केली होती, त्यांना त्यांनी सरन्यायाधीश होऊ दिले नाही, आणि हे संवैधानिक लोकशाहीत घडले होते.

आपल्याला माहीतच आहे की सुप्रीम कोर्टाने शाह बानो खटल्या प्रकरणात निकाल दिला होता. एका वृद्ध महिलेला न्याय देण्याचं काम सुप्रीम कोर्टाने संविधानाच्या मर्यादा आणि भावना जपत केलं होतं. मात्र त्या काळातील पंतप्रधान राजीव गांधी यांनी सुप्रीम कोर्टाच्या त्या निर्णयाला नाकारलं आणि कट्टरपंथीयांच्या दबावाखाली संविधानाची भावना पायदळी तुडवली. त्यांनी संसदेत कायदा करून सुप्रीम कोर्टाचा निर्णय उलथवून टाकला.




नेहरूजींनी सुरुवात केली, इंदिराजींनी पुढे नेलं, आणि राजीवजींनी त्याचं पोषण केलं. संविधानाशी खेळण्याची सवय त्यांच्या रक्तात होती. पुढची पिढीही याच मार्गावर गेली. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पुस्तकात कबूल केलं होतं की, पक्षाध्यक्ष सत्ता केंद्र आहे, सरकार पक्षाप्रति जबाबदार आहे.


इतकंच नाही तर एक पिढी पुढे जाऊया आणि त्या पिढीने काय केलं ते पाहूया. भारतीय संविधानानुसार देशातील जनता जनार्दन सरकारला निवडून देते आणि त्या सरकारचा प्रमुख मंत्रिमंडळ बनवतो, हे संविधानाच्या अंतर्गत आहे. या मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय उद्धट व्यक्तीने पत्रकारांसमोर फाडला आणि त्यांनी संविधानाचा अवमान केला. प्रत्येक संधीवर संविधानाशी खेळणे, संविधानाचा अवमान करणे, ही सवय झाली आहे आणि दुर्दैव बघा, एखादा अहंकारी माणूस मंत्रिमंडळाचा निर्णय फाडतो आणि मंत्रिमंडळाला निर्णय बदलायला भाग पाडतो, ही कसली व्यवस्था? काँग्रेस पक्षाने वारंवार संविधानाचा अनादर केला असून त्याचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत. काँग्रेसच्या वारशामध्ये संविधानाचे उल्लंघन आणि संविधानिक संस्थांकडे दुर्लक्ष केल्याच्या अनेक घटना आहेत. अनुच्छेद ३७० बद्दल बरेच जण जाणून आहेत, पण खूप कमी लोकांना अनुच्छेद ३५अ बद्दल माहिती आहे. संविधानानुसार संसदेसमोर मांडल्याशिवाय कोणतेही कलम लागू करता येऊ नये, पण अनुच्छेद ३५अ संसदेमध्ये न मांडता देशावर लादले गेले.

ही कृती संसदेच्या पवित्रतेला डावलून झाली. संसदेचा अधिकार बाजूला सारण्यात आला आणि संसदेला विश्वासात न घेता राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे अनुच्छेद ३५अ लागू करण्यात आले. जर अनुच्छेद ३५अ लागू झाले नसते, तर जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती इतकी बिघडली नसती. या एकतर्फी निर्णयामुळे लोकशाही आणि संविधानिक नियमांचे उल्लंघन झाले आणि देशासमोर दीर्घकालीन आव्हाने निर्माण झाली.

हा संसदेचा अधिकार होता, कोणीही मनमानी करू शकत नाही पण त्यांच्याकडे बहुमत असल्याने ते ते करू शकले असते. पण पोटात पाप असल्याने त्याने तसे केले नाही. देशातील जनतेपासून त्यांना ते लपवायचे होते. एवढेच नाही तर बाबासाहेब आंबेडकर ज्यांच्याबद्दल आज सर्वांना आदर वाटतो. ते आपल्यासाठी खूप खास आहेत कारण आपल्याला आयुष्यात जे काही महान मार्ग मिळाले आहेत ते आपल्याला तिथूनच मिळाले आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलही त्यांच्या मनात खूप कटुता आणि द्वेष होता, मला आज त्याच्या तपशिलात जायचे नाही, पण अटलजींची सत्ता असताना बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थ स्मारक बांधण्याचा निर्णय घेण्यात आला, अटलजींच्या काळात ते घडले.

दुर्दैवाने यूपीए सरकार १० वर्षे सत्तेत होते, त्यांनी हे काम केले नाही आणि होऊ पण दिले नाही. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आमचे सरकार आल्यावर बाबासाहेब आंबेडकरांबद्दलच्या आदरापोटी आम्ही अलीपूर रोडवर बाबासाहेबांचे स्मारक बांधले आणि ते काम पूर्णत्वास नेले. ■

# विधायक मतभिन्नता हवी!



● राम माधव

> सावरकर, गांधी, आंबेडकर यांचे एकमेकांशी मतभेद असतील; पण या साऱ्याच महान राष्ट्रनिर्मात्यांनी परस्परांचा अनादर केलेला नाही आज मात्र काँग्रेस पक्ष, देशाच्या गृहमंत्र्यांची विधानेसुद्धा विपर्यस्तपणे पाहातो आहे आणि आंबेडकरांचे केवळ नाव वापरून राजकारण करतो आहे!

**देशाचे** गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत केलेल्या निवेदनाला विरोध करण्यासाठी निव्वळ राजकीय हेतूनेच झालेली काँग्रेस पक्षाची निदर्शने, त्याचे हाणामारीत आणि दोघा खासदारांना रुग्णालयात दाखल करावे लागण्यात झालेले पर्यवसान, हे सारेच अतीव दुर्दैवी आहे. वास्तविक सभागृहातील काँग्रेस सदस्यांना उद्देशून शाह म्हणाले होते, 'आजकाल आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर असे म्हणत राहाणे ही (विरोधी पक्षीयांसाठी) फॅशन ठरते आहे इतक्या वेळा देवाचे नाव घेतले असतेत तर सात जन्म स्वर्ग मिळाला असता. तुम्ही आंबेडकरांचे नाव घेता यात आम्हाला आनंदच आहे. शंभरदा तुम्ही आंबेडकरांचे नाव घ्याल पण आंबेडकरांबद्दल तुमचे खरे मत काय होते हेही आता मी सांगतो. या देशाच्या पहिल्या मंत्रिमंडळातून राजीनामा देण्याची सक्ती आंबेडकरांवर का करण्यात आली? आंबेडकर म्हणालेले आहेत की अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीमुळे ते नाराज होते, तत्कालीन सरकारचे परराष्ट्र धोरण आणि 'अनुच्छेद ३७०' हे त्यांना पटत नव्हते. त्यामुळे त्यांना राहावेसे वाटत नव्हते. आंबेडकर आणि राजाजींसारखे लोक मंत्रिमंडळ सोडून जात आहेत, याबद्दल चिंता व्यक्त करणारे पत्र बी.सी. रॉय यांनी लिहिले. नेहरूंनी त्यावर उत्तर दिले की राजाजींच्या जाण्याने थोडेफार नुकसान होईल, पण आंबेडकर निघून गेल्यामुळे मंत्रिमंडळ कमकुवत होणार नाही. हे तुमचे (आंबेडकरांबद्दलचे) विचार. एखाद्याला विरोध करून वर त्याचेच नाव मतांसाठी घेत राहायचे, हे औचित्याला धरून ठरते का?''




**अनेक वर्षे सत्तेत राहूनही काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचे एकही स्मारक उभे केले नाही. मोदी सरकारने गेल्या १० वर्षात डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा परिचय करून देणारी स्मारके नवी दिल्ली, लंडन आदी ठिकाणी उभी केली आहेत.**

याच निवेदनात शाह यांनी, मध्य प्रदेशातील महू या डॉ. आंबेडकरांच्या जन्मगावी त्यांचे स्मारक बांधण्यास काँग्रेसने 'वैयक्तिक स्मारके खासगी संसाधनांचा वापर करून बांधली पाहिजेत' अशा कारणाने नकार दिल्याची आठवण करून दिली. 'इतकी स्मारके (काँग्रेस नेत्यांची) सगळीकडे बांधली गेली आहेत त्यांचे काय?' असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. महू, लंडन, दिल्ली, नागपूर आणि मुंबई येथे आंबेडकरांची स्मारके भाजपच्या सरकारने बांधली आहेत आणि आंबेडकरांशी संबंधित या पाच पवित्र स्थानांचे वर्णन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पंचतीर्थ' या शब्दात केलेले आहे. याची आठवण शाह यांनी दिली. यात आंबेडकरांचा अपमान कुठे आहे? काँग्रेस पक्षाचा दुटप्पीपणा उघड करण्याचा शाह यांचा हेतू होता. स्वर्गाबद्दलची त्यांची टिप्पणी आंबेडकरांच्या अनुयायांना उद्देशून नव्हती, तर आंबेडकरांना केवळ मते मिळविण्याचे साधन म्हणून पाहणाऱ्या काँग्रेससारख्या पक्षांसाठी होती. त्यातही लक्षात घेण्याजोगी बाब अशी की, शाह यांच्या ९० मिनिटांच्या भाषणादरम्यान काँग्रेस पक्षाकडून कोणताही विरोध झाला नाही. काही तासांच्या नंतर, जणू कोणीतरी उकसवल्यामुळे, काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी विरोध सुरू केला. यातूनच स्पष्ट होते की, इथे कोणतीही खरी भावना दुखावलेली नव्हती, तर हा सारा राजकीय बनाव होता.

### विरोध आणि सहकार्य

महात्मा गांधी, आंबेडकर आणि सावरकरांसारख्या नेत्यांना कोणत्याही एका गटाची किंवा पक्षाची मालमत्ता मानता कामा नये. ते आपले राष्ट्रीय नायक आहेत. ते नेहमीच एकमेकांशी सहमत होते, असे नाही. गांधींनी त्यांच्या शेवटच्या विधानात लिहिले होते की, काँग्रेसला सत्तेचे साधन ठरू देऊ नये आणि म्हणून ती विसर्जित केली पाहिजे. आंबेडकर हे काँग्रेसचे आजीवन टीकाकार होते. एका प्रसंगी तर, काँग्रेस पक्षात जाण्यापेक्षा आत्महत्या करेन अशा अर्थाचे उद्गार त्यांनी काढले होते. सावरकरांचेही गांधींच्या राजकारणाशी मतभेद होते. तरीही त्यांनी नेहमीच अत्यंत परिपक्वता दाखवली. १९४७ सालच्या हंगामी सरकारमध्ये आंबेडकर, राजगोपालाचारी आणि श्यामाप्रसाद मुखर्जी यांसारख्या विरोधी नेत्यांचा समावेश करण्यास गांधींनीच नेहरूंना सांगितले. सावरकरांनी १९३४ मध्ये गांधींना रत्नागिरीला आमंत्रित केले आणि दोघांनी दिवसभर चर्चा केली. या नेत्यांच्या राजकीय मतभेदांच्या पलीकडे त्यांचे राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान निश्चितपणे आहे.

### आंबेडकर आणि मनुस्मृती

विद्वान शशी शेखर शर्मा ज्याला 'कल्पित मनुवाद' म्हणतात त्यावरून सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडण्याचा निष्फळ प्रयत्न करण्यातूनही विरोधकांनी आपली अपरिपक्वताच दाखवून दिली. मनुस्मृतीच्या प्रती हातात फडकावणाऱ्यांपैकी कोणीही ते वाचलेले नसेल, अर्थातच त्यांनी आंबेडकरदेखील पूर्णपणे वाचलेले नाहीत हेही नक्की. कित्येक शतकांपूर्वी लिहिलेली संहिता या युगात योग्य

## नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए)

**देशाची फाळणी होत असताना काही मंडळींकडून दलित, मुस्लिम ऐक्याची कल्पना मांडली गेली. या कल्पनेच्या अनुषंगाने जोगेंद्रनाथ मंडल या दलित नेत्याने पाकिस्तानच्या निर्मितीला पाठिंबा दिला. त्यावेळच्या पूर्व बंगालमधील नमोशुद्र, मतुआ या दलित समाजातील जातीच्या लोकांनी फाळणी झाल्यावर पाकिस्तानातच राहण्याचा निर्णय घेतला. जोगेंद्रनाथ मंडल यांना पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान बॅ.जिना यांनी पाकिस्तानचे कायदा मंत्री केले. मात्र स्वतंत्र पाकिस्तानमध्ये पूर्व बंगालमधील दलित समाजावर अनन्वित अत्याचार सुरू झाल्यावर जोगेंद्रनाथ मंडल यांना पाकिस्तानातून पलायन करावे लागले आणि भारतात आश्रय घ्यावा लागला. पाकिस्तान, बांग्लादेश, अफगाणिस्तान या देशांमध्ये हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन या धर्मांच्या नागरिकांवर धर्माच्या आधारावर अत्याचार झाले तर त्यांना भारतात आश्रय घेऊन भारतीय नागरिकत्व देण्यासाठी मोदी सरकारने २०१९ मध्ये नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती केली. याचा सर्वात मोठा फायदा पश्चिम बंगालमधील मागासवर्गीय नागरिकांना झाला आहे.**

मानली जावी, असा आग्रह आज कोणीही धरत नाही. तरीसुद्धा एखाद्या पक्षावर– किंवा समूहावर– 'मनुवादी' असा शिक्का मारून पाहाणे ही बौद्धिक दिवाळखोरी आहे. मनुस्मृतीसह अनेक संहिता प्राचीन भारतात अस्तित्वात होत्या; परंतु त्यापैकी एकाही स्मृतीची सक्ती कुणा राज्यकर्त्याने केलेली नव्हती. त्या मुख्यत्वे नैतिक संहिता होत्या. त्यांमधले काही घटक मात्र, त्यांचा उद्देश संपून गेल्यावरही उरले. या प्रतिगामी घटकांविरुद्ध लढण्यासाठी आंबेडकरांनी १९२७ मध्ये जाहीरपणे मनुस्मृतीचे प्रतीकात्मक दहन केले. परंतु याच स्मृतींमधील काही मौल्यवान घटकांकडे आंबेडकरांनी डोळेझाक केलेली नाही. २४ फेब्रुवारी १९४९ रोजी हिंदू कोड बिलावर संविधान सभेत बोलताना आंबेडकर म्हणाले की, ''मनुस्मृती आणि याज्ञवल्क्य स्मृती या दोनच, त्या काळात रचल्या गेलेल्या एकंदर १३७ स्मृतींपैकी सर्वोच्च स्थानी आहेत''. त्या स्मृतीकारांनी मुलींना कौटुंबिक वारशाचा चौथा वाटा मिळावा, अशा हक्काचा अधिकार दिला होता, याची आठवण आंबेडकरांनी सभागृहाला करून दिली. तथापि, ब्रिटिश सरकारने 'लिखित नीतीपेक्षा रीतिरिवाज ग्राह्य' असा निर्णय दिल्यामुळे 'ग्रंथांचा प्रभावीपणा नष्ट झाला आहे' याबद्दल आंबेडकरांनी खेद व्यक्त केले. या निर्णयामुळे 'आमच्या ऋषींनी आणि आमच्या स्मृतीकारांनी' कोणते कायदे वा नियम तयार केले आहेत हे तपासणे न्यायव्यवस्थेला अशक्य ठरल्याचे सांगून आंबेडकर म्हणाले की, 'जर प्रिव्ही कौन्सिलने (पारतंत्र्यकालीन केंद्रीय न्यायालयाने) तो निर्णय दिला नसता', तर 'एखाद्या तरी वकील किंवा न्यायाधीशाने याज्ञवल्क्य आणि मनुस्मृतीतला हा मजकूर शोधला असता, त्यानुसार निर्णय झाले असते आणि आजच्या स्त्रिया जास्त नाही तर चौथा हिस्सा मिळाल्याने सुखावल्या असत्या.'' या भाषणानंतरही एके ठिकाणी आंबेडकर नमूद करतात की त्यांनी जात निर्धारण आणि वारसा हक्क यासारख्या मुद्द्यांसाठी मनुस्मृतीचा वापर केला होता.

### दानवीकरण नको

महान नेत्यांच्या विचारांची वा कृतीची छाननी आणि त्यांवर टीका होण्यात काही वावगे नाही. जगभर अशी उदाहरणे आहेत. बिस्मार्कला जर्मन इतिहासातील सर्वात महान एकीकरणकर्ता, 'आयर्न चॅन्सेलर' म्हणून गौरवण्यात आले; पण आज त्याचा वारसा चिकित्सकपणे तपासलाही जातो. अब्राहम लिंकन हे अमेरिकेच्या इतिहासातील महान राष्ट्राध्यक्ष मानले जातात;तरीही वर्णद्वेषी भाषा वापरल्याबद्दल आणि कृष्णवर्णीयांच्या मतदानाच्या अधिकारांना अगदी उशिरा समर्थन दिल्याबद्दल त्यांच्यावर टीकादेखील होते. ब्रिटनमध्ये विन्स्टन चर्चिल यांना 'राष्ट्राचे तारणहार' मानले जाते; पण त्यांचा गुंतागुंतीचा इतिहास हा मोठ्या वादाचा आणि टीकेचा विषय आहे. संसदेत जे घडले ते अतीव दुर्दैवी,असे म्हणताना माझा मुद्दा एवढाच की, राष्ट्र नायकांना 'एकतर देव, नाही तर दानव' असे न मानता, आदराने वागवण्याची परिपक्वता आपला राजकीय वर्ग आत्मसात करू शकतो का? कुणाचेही दानवीकरण न करता विधायक मतभिन्नता बाळगण्यास सहमती असणार की नाही?

**(लेखक हे 'इंडिया फाउंडेशन'चे अध्यक्ष, भाजपाचे माजी पदाधिकारी आहेत.)**

# डॉ. आंबेडकरांचा अवमान करणा-या काँग्रेसनेच माफी मागावी


● **रवीशंकर प्रसाद**, माजी केंद्रीय कायदा मंत्री

> केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विधानाचा विपर्यास करत काँग्रेसने भारतीय जनता पार्टी विरोधात अपप्रचाराची मोहीम सुरू केली आहे. भारतरत्न वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय कारकिर्दीकडे नजर टाकल्यावर या महामानवाचा काँग्रेसने अनेकदा हेतूपूर्वक अपमान केला, याचे अनेक पुरावे इतिहासात मिळतील.



**स्वतंत्र** भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांनी डॉ. आंबेडकरांना अनेकदा अवमानित केले. स्वतंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मुंबईतून लढत होते. स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यात आणि शोषित-वंचितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी मोठे योगदान दिले होते. अशा महामानवाला लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी पं. नेहरू आणि काँग्रेस पक्षाने आपली ताकद पणाला लावली. डॉ. बाबासाहेबांना १९५२ च्या निवडणुकीत पराभूत करण्यात काँग्रेस नेतृत्वाला यश मिळाले. डॉ.बाबासाहेबांनी १९५४ मध्ये भंडारा मतदारसंघातून लोकसभेची पोटनिवडणूक लढवली. त्या पोटनिवडणुकीतही काँग्रेसने बाबासाहेबांना पराभूत करण्याचे प्रयत्न केले. पं. नेहरू पंतप्रधान असताना त्यांच्याच सरकारने नेहरूंना भारतरत्न पुरस्काराने गौरवले. मात्र नेहरूंनी भारतीय घटनेचे शिल्पकार असलेले डॉ.बाबासाहेबांना भारतरत्न प्रदान केला नाही. काँग्रेसच्या अवमानकारक वागणुकीला कंटाळूनच डॉ.बाबासाहेबांनी केंद्रीय कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला. केंद्र सरकारच्या अनेक संस्था, पुरस्कार नेहरू-गांधी घराण्यातील व्यक्तींच्या नावे आहेत. मात्र काँग्रेसने केंद्र सरकारच्या एकाही संस्थेला, उपक्रमाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले नाही. डॉ.बाबासाहेबांच्या आजवर कार्याचे स्मरण करून देणारे एकही स्मारक काँग्रेसने देशाची सत्ता अनेक वर्षे उपभोगत असताना उभे केले नाही. मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेबांचे स्मारक उभारण्याची कल्पना केंद्रात आणि महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता असताना साकार होऊ शकली नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर इंदू मिल येथे डॉ.आंबेडकरांचे स्मारक उभे करण्याच्या मार्गातील सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय अडथळे दूर करण्यात आले.

एखादा केंद्रीय मंत्री जेव्हा आपल्या पदाचा राजीनामा देतो तेव्हा त्याला राजीनामा संदर्भातील आपली भूमिका संसदेपुढे मांडण्याची संधी दिली जाते. मात्र



डॉ.आंबेडकरांना नेहरू सरकारने अशी संधी दिली नाही. डॉ.आंबेडकरांनी आपल्या राजीनामा पत्रात त्यावेळचे पंतप्रधान नेहरू आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. (डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या पत्रातील मजकुराचा सारांश याच अंकात देण्यात आला आहे.) डॉ.आंबेडकरांनी त्यावेळचे पंतप्रधान पं. नेहरू यांना पाठविलेले राजीनामा पत्र काँग्रेसने कधीच सार्वजनिक होऊ दिले नाही. डॉ. आंबेकडरांनी आपल्या पत्रात पं. नेहरू यांच्यावर प्रखर टीका केली असल्यामुळेच काँग्रेस सरकारने डॉ. आंबेडकरांचे हे पत्र दडवून ठेवले. डॉ. आंबेडकरांना संविधान समितीचे सदस्य बनविण्याची तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरू आणि काँग्रेसची तयारी नव्हती. मात्र परिस्थितीमुळे पं. नेहरूंना संविधान समितीचे सदस्य म्हणून डॉ. आंबेडकरांच्या नावाला संमती द्यावी लागली. पं. नेहरू आणि काँग्रेसने डॉ.आंबेडकरांचा आत्यांतिक द्वेषच केला. डॉ.आंबेडकरांनी देशातील वंचित घटकांना, 'शिका आणि संघटीत व्हा', हा मंत्र दिला. त्यांच्या संघर्षपूर्ण जीवनकार्याचा परिचय होण्यासाठी त्यांचे यथोचित स्मारक होणे अत्यंत गरजेचे होते. मात्र काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचे असे स्मारक होऊच दिले नाही. मध्य प्रदेशात सुंदरलाल पटवा यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकार सत्तेत आल्यावर या सरकारने महू या डॉ. बाबासाहेबांच्या जन्मगावी डॉ. आंबेडकरांचे स्मारक उभे केले. काँग्रेसने देशाची सत्ता अनेक वर्षे उपभोगली. मात्र काँग्रेसला दिल्लीत डॉ.आंबेडकरांचे स्मारक उभारण्याची इच्छा कधी झाली नाही. चंद्रशेखर पंतप्रधान असताना त्यांनी डॉ.आंबेडकरांच्या स्मारकासाठी दिल्लीत जागा मंजूर केली. मात्र त्यानंतर सत्तेत आलेल्या काँग्रेसने या स्मारकाचे बांधकाम सुरूच होऊ दिले नाही. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर दिल्लीतील डॉ. आंबेडकर स्मारकाचे काम वेगाने पूर्ण करण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी लंडन येथे वास्तव्य केलेली जागाही मोदी सरकारने विकत घेऊन तेथे डॉ. बाबासाहेबांचे स्मारक उभे केले. देशाची आणि अनेक राज्यांची सत्ता काँग्रेसने अनेक वर्षे उपभोगली. मात्र काँग्रेसने लंडनमधील डॉ.बाबासाहेबांनी वास्तव्य केलेल्या निवासस्थानी स्मारक उभारण्याची इच्छा दाखवली नाही. कारण काँग्रेस नेतृत्वाला डॉ. आंबेडकरांबद्दल कधीच मनापासून प्रेम, आदर नव्हता. बाबासाहेबांना आपल्या प्रखर बुद्धिमत्तेच्या आणि उच्च शिक्षणाच्या बळावरच घटनेच्या मसूदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले गेले. कायदे पंडित असणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठातून तीन वेगवेगळ्या शाखातील पदव्युत्तर शिक्षण (मास्टर्स डिग्री) घेतले होते. अत्यंत प्रतिकूल वातावरणात व्यवस्थेशी संघर्ष करत डॉ. आंबेडकरांनी आपले स्थान निर्माण केले होते. अशा व्यक्तीमत्वाचा आदर करण्याऐवजी काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचा नेहमी द्वेषच केला. डॉ. आंबेडकरांनी कायदा मंत्रीपद सोडल्यावर पं. नेहरू






यांनी लेडी माऊंटबॅटन यांना पाठवलेल्या पत्रात,'मला आता मोकळे झाल्यासारखे वाटत आहे,' असा उल्लेख केला होता. यावरूनच पं. नेहरू आणि काँग्रेसची डॉ. आंबेडकरांबाबतची मनोवृत्ती किती द्वेषमूलक होती, हे दिसून येते. याच काँग्रेस पक्षाचे नेते आज भारतीय जनता पार्टी विरोधात आंदोलन करत आहेत. यातून काँग्रेसचा ढोंगीपणा आणि दुटप्पीपणा दिसून आला आहे. पं. नेहरू आणि त्या कालखंडातील अन्य काँग्रेस नेत्यांनी डॉ. आंबेडकर यांचा कसा अवमान केला याचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहेत. सामान्य माणसाला लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा बहुमोल अधिकार बाबासाहेबांनी संविधानाद्वारे दिला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी आणिबाणीत संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच घाला घातला. बाबासाहेबांच्या संविधानाचा असा अपमान केल्याबद्दल काँग्रेस नेतृत्वाने संपूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे. बाबासाहेबांना भारतरत्न न देणाऱ्या काँग्रेस सरकारने बाबासाहेबांना निवडणुकीत पराभूत करणाऱ्या नारायण सदोबा करजोलकर यांना पद्मभूषण पुरस्कार दिला. याच करजोलकर यांच्यासाठी पं. नेहरू यांनी डॉ.आंबेडकर यांच्या विरोधात व्यक्तीश: प्रचार केला होता.

देशाची फाळणी करण्यास बाबासाहेबांनी प्रखर विरोध केला होता. त्यावेळच्या पूर्व बंगालमध्ये हिंदूंवर झालेल्या अत्याचाराचाही डॉ. बाबासाहेबांनी तीव्र निषेध केला होता. देशाच्या उभारणीसाठी ज्यांनी-ज्यांनी योगदान दिले त्यांच्या राजकीय पार्श्वभूमीचा विचार न करता त्यांचा गौरव करावा, अशी भारतीय जनता पार्टीची भूमिका आहे. भारतीय जनता पार्टीला सातत्याने विरोध करणाऱ्या मुलायम सिंह यादव, शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांना मोदी सरकारने पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे. काँग्रेसची सत्ता असताना काँग्रेसला विरोध करणाऱ्या कोणत्याच नेत्याला देशाच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले गेले नाही. देशाच्या उभारणीत फक्त नेहरू आणि गांधी कुटुंबांचे योगदान आहे, अशी काँग्रेसची मानसिकता आहे. सरदार पटेल, मौलाना आझाद यासारख्या नेत्यांनीही देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. मात्र या दोघांना मरणोत्तर भारतरत्न मिळण्यासाठी ३०-४० वर्षे जावी लागली. पं. नेहरूंनी हयातीतच आपल्या सरकारकडून भारतरत्नने सन्मानित करून घेतले. १९५२ ते १९७७ अशी सलग २५ वर्षे काँग्रेसची देशावर सत्ता होती. त्यानंतर १९८० ते १९९० अशी सलग १० वर्षे काँग्रेसचे सरकार केंद्रात सत्तेत होते. मात्र काँग्रेसला डॉ. आंबेडकरांना भारतरत्न देण्याची इच्छा झाली नाही. पं. नेहरूंच्या धोरणांना विरोध केला म्हणूनच डॉ. आंबेडकर, सरकार पटेल आणि मौलाना आझाद यांना काँग्रेस सरकारने भारतरत्न दिला नाही. काँग्रेसचा हा इतिहास आम्ही जनतेपुढे मांडणार आहोत. ■

# घटनेची सर्वाधिक मोडतोड नेहरु-गांधी खानदान व काँग्रेसनेच केली

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)



## संविधान निर्मितीची कार्यपद्धती

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण आपले संविधान स्वीकारले. हे संविधान तयार करण्यासाठी Constituent assembly नियुक्त केली होती. ही Constituent assembly ब्रिटिश सरकारने देऊ केलेल्या Cabinet Mission Plan च्या माध्यमातून १९४६ साली अस्तित्वात आली. प्रौढ मताधिकार पद्धतीचा वापर करून जनतेने निवडून दिलेली लोकनियुक्त संस्था असे तिचे स्वरूप नव्हते. तर सर्व राज्यांच्या विधान मंडळांनी अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून दिलेले प्रतिनिधी त्यामध्ये होते. ह्या संविधान समितीमध्ये एकूण ३८९ सभासद होते. त्यापैकी २९२ राज्यांचे, ९३ संस्थानांचे आणि दिल्ली, अजमेर-मारवाड, कूर्ग आणि बलुचिस्तान ह्यांचे चार प्रतिनिधी होते. ऑगस्ट १९४६ मध्ये राज्यांच्या विधिमंडळांनी निवडून द्यावयाच्या जागांची निवडणूक झाली. त्यात काँग्रेसने २०८ व मुस्लिम लीगने ७३ जागा जिंकल्या. पण मुस्लिम लीगने संविधान समितीच्या कामकाजात भाग घ्यायला सुरुवातीलाच नकार दिला आणि मुसलमान धर्मियांसाठी वेगळ्या संविधान समितीची मागणी केली. ह्या Constituent assembly ची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळापत्रक निश्चित झाल्यानंतर ह्या समितीची बैठक १४ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रज सत्तेची जागा घेणारी सार्वभौम संस्था म्हणून झाली तर शेवटची बैठक २४ जानेवारी १९५० रोजी झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्याच Constituent assembly ने भारताचे संविधान लिहिण्याचे काम हाती घेतले व ते दोन वर्षे, अकरा महीने व अठरा दिवस चालले. ह्या काळात संविधान समितीच्या बैठकांची एकूण अकरा सत्रे झाली व एकंदर १६५ दिवसांचे कामकाज झाले. ह्या १६५ दिवसांपैकी ११४ दिवस मसुदा तयार करणे व त्यावर चर्चा करणे ह्यासाठी लागले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान समितीने संविधान लिहिण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'मसुदा समिति' नियुक्त केली. ह्या समितीने साठ देशांच्या घटनांचा अभ्यास करून आपला मसुदा तयार केला होता. त्या मसुद्याची चर्चा करताना त्यात ७६३५ दुरुस्त्या मांडल्या गेल्या आणि चर्चेनंतर त्यापैकी २४७३ दुरुस्त्या विचारात घेतल्या गेल्या. एवढे कष्ट घेतल्यानंतर अंतिम मसुदा तयार झाला.

## घटना दुरुस्तीसाठी निश्चित केलेली कार्यपद्धती व आजवर झालेल्या दुरुस्त्यांचा आढावा

ह्या चौऱ्याहत्तर वर्षांच्या काळात आपल्या संविधानात एकंदर १०६ दुरुस्त्या केल्या गेल्या आहेत. संविधानात दुरुस्ती करण्याची गरज निर्माण होऊ शकते ही संभाव्यता घटनाकारांनी सुरुवातीलाच लक्षात घेतली होती व घटना दुरुस्तीची कार्यपद्धती निश्चित करून दिली होती. त्यानुसार एकंदर तीन प्रकारच्या घटना दुरुस्ती करण्याची तरतूद आपल्या घटनेत आहे. त्यापैकी पहिल्या प्रकारची घटना दुरुस्ती संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये साध्या बहुमताने केली जाते तर दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या घटनादुरुस्तीसाठी घटनेच्या ३६८व्या कलमाचा आधार घ्यावा लागतो. ह्या कलमानुसार दुसऱ्या प्रकारची घटना दुरुस्ती संसदेच्या दोन्ही सभागृहात किमान दोन तृतीयांश बहुमताने मंजूर करावी लागते तर तिसऱ्या प्रकारच्या दुरुस्तीसाठी संसदेच्या मान्यतेबरोबरच किमान पन्नास टक्के राज्यांच्या विधानसभांची मंजूरी आवश्यक असते. आजवर झालेल्या एकूण घटना दुरूस्त्यांपैकी ४२ दुरुस्त्या तिसऱ्या प्रकारच्या होत्या.

आजवर झालेल्या १०६ घटना दुरूस्त्यांची छाननी केली तर आजवर होऊन गेलेल्या राज्यकर्त्या नेत्यांच्या व पक्षांच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो. ह्या घटनादुरूस्त्यांपैकी बहुतांश दुरूस्त्या स्वाभाविकपणे काँग्रेस राजवटीत झाल्या. त्यातही नेहरूंच्या काळात १७, इंदिरा गांधींच्या काळात २९ व राजीव गांधींच्या काळात १० अशा एकंदर ५६ दुरुस्त्या– ५०%पेक्षा जास्त – नेहरू–गांधी परिवाराच्या कारकिर्दीत झाल्या.

कै. अटलजींच्या कारकिर्दीत एकूण १९ दुरुस्त्या झाल्या. त्यापैकी बहुतेक दुरुस्त्या वेगवेगळ्या सामाजिक आरक्षणांची व्याप्ती अथवा कालमर्यादा वाढवणाऱ्या होत्या. त्यांनी केलेली महत्वाची दुरुस्ती म्हणजे केंद्र व राज्य मंत्रिमंडळाच्या संख्येवर निर्बंध घालणारी ९१ वी दुरुस्ती ! मा. नरेंद्रजी मोदी ह्यांच्या कारकिर्दीत सहा दुरुस्त्या झाल्या त्या सामाजिक आरक्षणे व कररचना ह्यांच्याशी संबंधित होत्या. आता आपण काही घटना दुरूस्त्यांचा तपशील व कार्यपद्धती यांची माहिती घेऊ.

### पहिली घटना दुरुस्ती

आपल्या घटनेत पहिली दुरुस्ती घटना स्वीकारल्यानंतर अवघ्या एक वर्षात केली गेली. पं.नेहरूंच्या हट्टापायी केलेल्या ह्या पहिल्या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्य हे होते की आपण स्वीकारलेल्या संविधानातील सर्व तरतुदींचा पूर्ण अधिक्षेप करून केवळ नेहरूंच्या हट्टापायी व प्रचंड बहुमताच्या जोरावर ती दुरुस्ती केली गेली. आपण २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचा स्वीकार केला, त्या घटनेनुसार २६ जानेवारी १९५० रोजी आपण स्वत:ला 'प्रजासत्ताक' म्हणून घोषित केले व आपल्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीची घोषणा झाली. आपल्या संविधानानुसार घटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार केवळ लोकांनी निवडून दिलेल्या संसदेला आहे. पण आपल्या घटनेत जी पहिली दुरुस्ती केली गेली ती करताना ही मुलभूत तरतूदच हेतुत: डावलली गेली. १० मे १९५१ रोजी पहिली दुरुस्ती केली तेव्हा लोकसभेच्या पहिल्या निवडणुकांची तयारी सुरु झाली होती. 'निवडणूक होऊन लोकांनी निवडलेली पहिली लोकसभा विधिवत अस्तित्वात येईपर्यंत घटनादुरूस्तीचा विचार करू नये' असे मत तेव्हाचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद व हंगामी लोकसभेचे सभापति पु.ग.मावळंकर ह्या दोघांनीही पंतप्रधान पं. नेहरूंना पत्र लिहून कळवले होते. नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री असलेले व घटनेचा मसुदा तयार करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विरोधी पक्षांचे नेतृत्व करणारे डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी, जयप्रकाश नारायण ह्यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांचा ह्या घटना दुरुस्तीला विरोध होता. विरोध करणाऱ्यांमध्ये काँग्रेसमधील अनेक नेत्यांचाही समावेश होता. पण त्यावेळेला वृत्तपत्रांमधून सरकारवर होणाऱ्या टीकेमुळे आणि न्यायालयांनी दिलेल्या काही सरकार विरोधी निकालांमुळे पं.नेहरू कमालीचे बिथरलेले होते. त्यामुळे घटनादुरुस्तीला होत असलेला सर्व विरोध डावलून व राष्ट्रपती तसेच लोकसभेच्या सभापतींचा सल्ला झुगारून देऊन केवळ बहुमताच्या जोरावर पं. नेहरूंनी पहिली घटना दुरुस्ती रेटून करून घेतली.

त्यावेळेला पूर्वीची Constituent assembly– 'घटना समिती' हीच कामचलाऊ लोकसभा म्हणून काम करीत होती. त्यामध्ये ८०% सभासद काँग्रेसचे होते व त्यापैकी बहुतेक सर्वांना येणारी लोकसभेची निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर लढवायची होती. त्यामुळे पं. नेहरूंच्या इच्छेविरुद्ध जाण्याची हिम्मत कोणीही दाखवत नव्हते. पं. नेहरू व काँग्रेस ह्यांच्या हट्टापायी केली गेलेली ही पहिली घटनादुरुस्ती जनतेचे भाषणस्वातंत्र्य, वृत्तपत्रांचे लेखनस्वातंत्र्य व न्यायालयांच्या अधिकारांचा संकोच

करणारी त्याचबरोबर नागरिकांच्या समतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारी होती. ही दुरुस्ती कायदामंत्र्यांनी नाही तर स्वत: पंतप्रधान पं.नेहरूंनी १० मे १९५१ रोजी मांडली व ती १८ जून १९५१ ला लागूही झाली. इतक्या कमी वेळात अंमलबजावणी झालेली ही एकमेव घटना दुरुस्ती आहे.

ह्या दुरुस्तीच्या माध्यमातून घटनेची १५, १९, ८५, ८७, १७४, १७६, ३४१, ३४२, १७२ व ३७६ एवढी कलमे एका फटक्यात बदलली गेली; ३१अ व ३१ब ही कलमे आणि सूची क्र. ९ हे नव्याने घुसडण्यात आले. ही सर्व कलमे नागरिकांच्या उच्चार, प्रचार व लेखनस्वातंत्र्याशी संबंधित होती. मूळ घटनेने दिलेले मूलभूत अधिकार मर्यादित करण्याचे काम ह्या दुरुस्तीद्वारे केले गेले. सूची ९ हे तर घटनेच्या मूळ ढाच्याच्या पूर्ण विरोधात होते. 'घटनेच्या मूळ तत्वाशी विसंगत असणारे कायदे केंद्र सरकारने केल्यास त्यांना संरक्षण देण्यासाठी' खास हे सूची तयार केले होते. अशा पद्धतीने घटनेत केली गेलेली पहिली दुरूस्तीच घटनेच्या मूळ ढाच्याची मोडतोड करणारी होती. शिवाय ती करण्यासाठी घटनेने ठरवून दिलेली कार्यपद्धती पायदळी तुडवताना पं.नेहरूंनी घटनाच बाजूला सारली होती.

पं.नेहरूंच्या कन्येने, इंदिरा गांधी यांनी त्याच पहिल्या घटना दुरुस्तीचे अधिक पुढचे पाऊल १९७५ साली टाकले व आपल्याविरुद्ध निकाल देणाऱ्या न्यायालयांच्या अधिकारांवर टांच आणली तसेच टीका करणाऱ्या वर्तमानपत्रांचा व विरोधकांचा गळा पूर्णपणे आवळण्यासाठी दडपशाहीचे कायदे करणाऱ्या कुप्रसिद्ध ४२ व्या घटना दुरुस्तीसह अनेक दुरुस्त्या केल्या. इंदिरा गांधी व काँग्रेसने ज्या फॅसिस्ट प्रवृत्तीचे प्रदर्शन आणीबाणीमध्ये घडवले त्याची सुरुवात पं.नेहरूंनी १९५० सालातच केली होती. मात्र ह्या पहिल्या तसेच ४२ व्या व अन्य घटनादुरुस्तीची चर्चा राहूल गांधी व त्यांचे डावे सहप्रवासी कधीच करत नाहीत. आपण त्यांची थोडी सविस्तर माहिती घेऊ.

### अडतिसावी घटना दुरुस्ती २२ जुलै - १ ऑगस्ट १९७५

इंदिरा गांधी व काँग्रेसने मनाला येईल त्याप्रमाणे संविधानाची मोडतोड करण्याची सुरुवात 'आणीबाणी लागू करण्याच्या घोषणे'पासूनच केली होती. ज्या पद्धतीने राष्ट्रपतींच्या नावाने एक अधिसूचना काढून देशात तात्काळ आणीबाणी लावली गेली त्या पद्धतीने देशांतर्गत आणीबाणी लागू करण्याची तरतूदच आपल्या संविधानात त्या दिवसापर्यंत -२५ जून १९७५ पर्यंत नव्हती. त्या अर्थाने जाहीर केलेली आणीबाणी पूर्णपणे घटनाबाह्य होती. आपल्या दडपशाहीच्या कृतीला घटनात्मक मान्यता आहे हे दाखवण्यासाठी **२२ जुलै १९७५ रोजी, आणीबाणी लागू केल्यानंतर अठ्ठावीस दिवसांनी इंदिरा गांधींनी ही घटनादुरुस्ती केली. ही घटनादुरुस्ती 'पूर्वलक्ष्यी प्रभावाने' (Retrospective effect) लागू केली. हा 'पूर्वलक्ष्यी प्रभावा'चा प्रकार देखील पूर्णपणे घटनाबाह्य, बेकायदा, अभूतपूर्व व अनैतिक होता.**

ह्या दुरुस्तीने घटनेची १२३, २१३, २३९ब, ३५२, ३५६,३५९, आणि ३६० एवढी कलमे बदलली गेली. ह्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून राष्ट्रपतींना देशांतर्गत कारणांसाठी केवळ अधिसूचना काढून आणीबाणी लागू करून सर्वंकष अधिकार आपल्याकडे घेण्याची व्यवस्था केली गेली. ह्याच दुरुस्तीनुसार राष्ट्रपतींच्या अशा अधिसूचनेला आक्षेप घेता येणार नाही किंवा न्यायालयात आव्हान देता येणार नाही, राष्ट्रपतींनी काढलेली अधिसूचना चर्चा किंवा समीक्षा करण्यापलीकडे असेल असेही स्पष्ट केले गेले. (This amendment made the declaration of emergency by the President non debatable and non-justiciable)

ह्या दुरुस्तीने न्यायव्यवस्थेचे अनेक अधिकार काढून घेतले. केंद्र सरकारच्या सर्व कारवाया व निर्णय न्यायालयीन चिकीत्सेच्या बाहेर काढून केंद्र सरकारला न्याययंत्रणेपासून पूर्ण संरक्षण दिले गेले. संविधानाने नागरिकांना दिलेले मूल भूत हक्क व अधिकार काढून घेण्याचे किंवा स्थगित करण्याचे अधिकार ह्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपतींना म्हणजेच केंद्र सरकारला दिले. एवढेच नाही तर देशातील विविध राज्य सरकारना 'मार्गदर्शन करण्या'चे अधिकार देखील राष्ट्रपतींना बहाल केले गेले. थोडक्यात राज्य सरकारांची मर्यादित मोकळीकसुद्धा काढून घेतली गेली. ह्या अडतिसाव्या घटना दुरुस्तीपासून अशा पद्धतीने दडपशाहीला उपयुक्त दुरुस्त्यांची एक मोठी मालिकाच सुरु झाली आणि बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीने त्यावर कळस चढवला.

**(पूर्वार्ध)**

# पंडित नेहरूंनी माझ्यावर कायम अन्याय केला

## केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा देताना डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केली होती खंत

● सुजीत भोगले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालील पहिल्या अंतरिम सरकारचा हिस्सा होते. या सरकारचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते आणि डॉ. आंबेडकर या मंत्रिमंडळात कायदा मंत्री म्हणून कार्यरत होते. पुढे संविधान बनवण्यासाठी जी समिती बनवण्यात आली तिचे अध्यक्षपद कायदा मंत्री या नात्याने बाबासाहेबांच्या कडेच आले होते.



**डॉ.** बाबासाहेब आंबेडकर हे नेहरूंच्या पहिल्या अंतरिम मंत्रीमंडळात कायदामंत्री म्हणून चार वर्ष एक महिना कार्यरत होते. डॉ. आंबेडकर यांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा २७ सप्टेंबरला दिला. नेहरूंनी २८ सप्टेंबरला मान्य केला आणि संसदेचे चालू अधिवेशन संपेपर्यंत कार्यभार सांभाळण्याची विनंती केली. त्यांनी मंत्रिमंडळातून राजीनामा देताना जे पत्र लिहिले आहे त्या पत्राचे सार इथे सादर करतो आहे.

राजीनामा देणाऱ्या सदस्याने आपले मनोगत व्यक्त करणे आवश्यक आहे म्हणून मी माझे मनोगत व्यक्त करतो आहे. मंत्रीमंडळ सदस्यांमध्ये मतभेद असले तरी सामान्यतः ते बाहेर प्रकट होत नाहीत. परंतु या सभागृहाचा सदस्य या नात्याने मी कोणत्या कारणांच्या साठी राजीनामा देतो आहे हे सांगणे आवश्यक वाटले आणि म्हणूनच हे पत्र मी सार्वजनिक करतो आहे. राजीनामा देणाऱ्या मंत्र्याने त्याची कारणे सांगितली नाहीत तर वृत्तपत्रे त्यांच्या पूर्वग्रहांच्या आहारी जाऊन यावर वार्तांकन करताना दिसतात. हे टळावे म्हणून हा संवाद करतो आहे.

मला पंतप्रधानांनी त्यांच्या मंत्रिमंडळातील कायदा मंत्रीपद स्वीकारण्यासाठी बोलावले त्यावेळी मी आश्चर्यचकित झालो होतो कारण मी त्यांच्या विचारधारेपेक्षा भिन्न विचारसरणीचा समर्थक होतो. पहिल्यांदा अंतरिम सरकार स्थापन झाले त्यावेळी मला आमंत्रण दिले गेले नाही, नंतर त्यांचे मतपरिवर्तन का झाले याची मला कल्पना नाही. परंतु मी हा प्रस्ताव स्वीकारला कारण राष्ट्र निर्मितीच्या कार्यात मी माझे सहकार्य नाकारणे योग्य नाही अशी माझी मनोभूमिका होती.

मी दिलेला राजीनामा तडकाफडकी नसून दीर्घकाळ झालेल्या उपेक्षेच्या नंतर विचारपूर्वकपणे घेतलेला हा निर्णय आहे. पंतप्रधानांनी मला कायदे मंत्रालय प्रदान केले आणि कायदे मंत्रालयाला प्रशासकीयदृष्ट्या महत्व नाही. त्यामुळे धोरणात्मक निर्णयांमध्ये मला सहभाग घेण्याची संधी मिळणार नाही हे उघड होते. आम्ही कायदा मंत्रालयाला रिकाम्या साबणाचा डबा म्हणायचो फक्त जुन्या वकिलांना खेळायला चांगला. मी पंतप्रधानांना सांगितले की, माझ्या शिक्षणाने आणि अनुभवाने वकील असण्याबरोबरच, मी कोणतेही प्रशासकीय विभाग चालवण्यास सक्षम आहे आणि जुन्या व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेत माझ्याकडे दोन प्रशासकीय खाती



होती, ती म्हणजे कामगार आणि C.P.W.D., जिथे माझ्याद्वारे मोठ्या प्रमाणात नियोजन प्रकल्प हाताळले गेले आणि मला काही प्रशासकीय पोर्टफोलिओ हवा आहे. पंतप्रधानांनी सहमती दर्शवली आणि सांगितले की त्यांना नियोजन विभाग बनवायचा आहे त्यात मी आपल्याला समाविष्ट करतो.

दुर्दैवाने नियोजन विभाग खूप उशिरा बनवला गेला आणि त्यात मला वगळण्यात आले. नंतर मंत्रिमंडळातील खाते बदलत सुद्धा मला संधी दिली गेली नाही. इतर मंत्र्यांना दोन तीन खाती दिली गेली आणि ते कामात गढून गेलेले असत आणि त्यामानाने मला पूर्णवेळ काम नव्हते. इतकेच नाही तर एखादा मंत्री परदेशात गेल्यावर त्याचा कार्यभार काही काळासाठी प्रभारी मंत्र्याकडे दिला जातो. मला ती संधी सुद्धा नाकारली गेली. परराष्ट्र व्यवहार समिती किंवा संरक्षण समिती यांसारख्या मंत्रिमंडळाच्या मुख्य समित्यांचा सदस्य म्हणूनही माझी नियुक्ती केली गेली नाही. जेव्हा अर्थशास्त्र व्यवहार समितीची स्थापना झाली, तेव्हा मी प्रामुख्याने अर्थशास्त्राचा विद्यार्थी असल्यामुळे या समितीवर नियुक्त होण्याची माझी अपेक्षा होती. पण मला डावलले गेले. पंतप्रधान इंग्लंडला गेले असताना माझी मंत्रिमंडळाने या समितीवर नियुक्ती केली. परंतु पंतप्रधान परत आल्यावर मला त्यातून वगळले गेले, मी निषेध नोंदवल्यावर मला परत घेतले गेले. माझी गुणवत्ता आणि माझे ज्ञान लक्षात घेऊन मला संधी दिली जावी असेच माझे कायमच मत होते. परंतु दुर्दैवाने याचा कधी विचारसुद्धा झाला नाही. मी सत्तेच्या राजकारणात कधीही रस बाळगून नव्हतो. पंतप्रधानांच्या गुणग्राहकतेवर माझा पूर्ण विश्वास होता परंतु माझ्यावर अन्याय होत होता हे सत्य नाकारणे पण मला शक्य होत नव्हते. जुन्या व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेत इंग्रजांनी मला अनुसूचित जातींच्या संवैधानिक सुरक्षेच्या बाबतीत अभिवचन दिले होते, इंग्रजांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. मागासवर्गीयांसाठी राज्यघटनेने कोणतेही संरक्षण दिलेले नाही आणि राष्ट्रपती या संदर्भात एका आयोगाचे गठन करतील आणि त्याच्या शिफारसींच्या आधारे सरकारतर्फे योजना आखली जाईल, असे मला आश्वासन दिले गेले होते, परंतु संविधान मंजूर होऊन एक वर्षाहून अधिक काल लोटला आहे परंतु असा आयोग नेमण्याचा विचार करायलाही सरकार तयार नाही. अनुसूचित जातीचे स्थान सुरक्षित ठेवण्यासाठी संविधानात केलेल्या तरतुदी माझ्या समाधानाच्या नव्हत्या. तथापि, सरकार त्यांना प्रभावी बनवण्याचा निर्धार दाखवेल या आशेने मी त्यांचा स्वीकार केला. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे किंवा संविधान लागू झाल्यावर सुद्धा अनुसूचित जातींच्या आयुष्यात काहीही बदल झालेला नाही. तोच जुना जुलूम, तोच जुना अत्याचार, तोच जुना भेदभाव जो पूर्वी अस्तित्वात होता,

आता अस्तित्वात आहे आणि कदाचित आधीच्या पेक्षाही अधिक वाईट स्वरूपात आहे. पोलीस आजही त्यांच्या तक्रारीसुद्धा नोंदवून घेत नाहीत आणि या संदर्भातील शेकडो प्रकरणे दिल्ली आणि सभोवतालच्या भागातील मागासवर्गीय नागरिकांनी मला सांगितली आहेत.

भारतातील अनुसूचित जातींची दुर्दशा संपता संपत नाही. अनुसूचित जातींची ही अवस्था आणि मुस्लिमांच्या रक्षणासाठी सरकार दाखवत असलेल्या काळजीची तुम्ही तुलना करा. पंतप्रधानांचा संपूर्ण वेळ आणि लक्ष मुस्लिमांच्या रक्षणासाठी दिला जातोय. भारतातील मुस्लिमांना जिथे जिथे आणि जेव्हा गरज असेल तेव्हा त्यांना सर्वोत्कृष्ट संरक्षण देण्याची पंतप्रधानांची इच्छा आहे. पण मला हे जाणून घ्यायचे आहे की, फक्त मुस्लिमांनाच संरक्षणाची गरज आहे का? अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि भारतीय ख्रिश्चनांना संरक्षणाची गरज नाही का? त्याने या समुदायांबद्दल कोणती काळजी दर्शविली आहे? परंतु या संदर्भातील स्थिती अत्यंत उद्वेगजनक आहे. सरकारकडून अनुसूचित जातींकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल मला जो राग आला होता तो मी स्वतःमध्ये ठेवू शकलो नाही आणि एका प्रसंगी मी त्याचा जाहीर उल्लेख केला. सदरील कार्यक्रमात गृहमंत्री होते आणि त्यांनी मला विचारले की अनुसूचित जातींना साडेबारा टक्के प्रतिनिधित्वाची हमी देणाऱ्या नियमाचा फायदा झाला आहे का नाही? जरी त्यांनी मला प्रश्न विचारला तरी त्यांना स्वतःलाही या संदर्भात शंका होती आणि त्यामुळे त्यांनी भारत सरकारच्या विविध विभागांना एक परिपत्रक पाठवून सरकारमध्ये किती अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती करण्यात आली आहे याचा अहवाल देण्यास सांगितले. बहुतेक विभागांनी उत्तरात शून्य किंवा जवळजवळ शून्य असे म्हटले आहे. अर्थात अनुसूचित जातींना आरक्षण घोषित केलेले असूनही त्याची अंमलबजावणी होत नाही आहे. माझा ज्या अनुसूचित जातीमध्ये जन्म झाला त्यांच्या उन्नतीसाठी मी स्वतःला समर्पित केले आहे. मी स्वार्थी विचार केला असता तर काँग्रेस पक्षाच्या सर्वोच्च स्थानापर्यंत पोचू शकलो असतो. परंतु मी मोहत्याग केला. त्यामुळे अनुसूचित जातीचे कारण काहीही नसताना पाहून मला किती वेदना झाल्या असतील याची तुम्ही कल्पना करू शकता. तिसरा मुद्दा ज्याने मला केवळ असंतोषच नाही तर खरी चिंता आणि चिंतेचे कारण दिले आहे, ते म्हणजे देशाचे परराष्ट्र धोरण. आपण स्वतंत्र झाल्यावर जगातील प्रत्येक राष्ट्राची आपल्याबद्दल सकारात्मक भावना होती. जगातील प्रत्येक देश आपला मित्र होता. आज चार वर्षांनंतर आमचे सर्व मित्र आम्हाला सोडून गेले आहेत. आमचे कोणतेही मित्र राहिले नाहीत. युनोमध्ये आपण एकटे पडलो आहोत.जेव्हा मी आपल्या परराष्ट्र धोरणाचा विचार करतो तेव्हा मला बिस्मार्क आणि बर्नार्ड शॉ यांनी सांगितलेल्या गोष्टींची आठवण होते. बिस्मार्कने म्हटले आहे की, राजकारण हा आदर्श साकारण्याचा खेळ नाही. राजकारण हा शक्यतेचा खेळ आहे. बर्नार्ड शॉ यांनी सांगितले आहे की आदर्शवादी असणे चांगले आहे परंतु बरेचदा चांगले असणे धोकादायक सिद्ध होते. जगातील दोन महान पुरुषांनी उच्चारलेल्या या शहाणपणाच्या शब्दांना आमचे परराष्ट्र धोरण पूर्णपणे विरोधात आहे.

आदर्शवादाच्या आहारी गेल्याने आपला लष्करावरील खर्च वाढतो आहे त्याचप्रमाणे आपल्याला औद्योगिकरणाचे लक्ष्य गाठता येत नसून आपल्या देशातील उपाशी लोकांसाठी अन्न मिळवण्यात सुद्धा अडचणी येत आहेत. ३६० कोटी रुपये देशाचे करांच्या माध्यमातून येणारे उत्पन्न आहे आणि आपण त्यातले १८० कोटी रुपये संरक्षणदलांवर खर्च करतो आहोत. हा प्रचंड खर्च आपल्या चुकीच्या परराष्ट्र धोरणाचा थेट परिणाम आहे. आम्हाला इतका खर्च करावा लागतो कारण आमचे कोणीही मित्र नाहीत ज्यांच्यावर आम्ही कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी अवलंबून राहू शकतो. हे योग्य प्रकारचे परराष्ट्र धोरण आहे का, असा प्रश्न मला पडला आहे.

पाकिस्तानशी आपले संबंध दोन कारणांनी बिघडले आहेत. पहिले कारण काश्मीर आणि दुसरे कारण पूर्व बंगाल. पूर्व बंगालची अधिक काळजी घेतली पाहिजे जिथे आपल्या लोकांची (हिंदूंची) स्थिती काश्मीरपेक्षा असह्य आहे. परंतु आपण मात्र काश्मीर प्रश्नावर सर्वस्व पणाला लावतो आहोत. काश्मीरची फाळणी हाच योग्य उपाय आहे असे माझे मत आहे. हिंदू आणि बौद्ध भाग भारताला आणि मुस्लिम भाग पाकिस्तानला द्या,जसे आपण संपूर्ण देशाच्या बाबतीत केले, हेच या समस्येचे समाधान आहे. संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये सार्वमत घेतले तर काश्मीरमधील हिंदू आणि बौद्धांना त्यांच्या इच्छेविरुद्ध पाकिस्तानात जावे लागण्याची जाण्याची शक्यता आहे आणि पूर्व बंगालमध्ये जे होत आहे तेच काश्मीरमध्ये सुद्धा सुरु होईल. **(पूर्वार्ध)**

# डॉ. आंबेडकरांशी संबंधित ठिकाणांचा 'पंचतीर्थ' म्हणून विकास




लंडन येथे डॉ. आंबेडकरांनी वास्तव्य केलेल्या निवासस्थानाचे स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे.




> भारतरत्न आणि संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित पाच ठिकाणांचा विकास मोदी सरकारद्वारा 'पंचतीर्थ' म्हणून करण्यात येत आहे.

**लंडन** येथील १० किंग हेन्री रोड, एनडब्लू ३ येथील वास्तूमध्ये डॉ. आंबेडकर यांचे स्मारक बनविण्याच्या निर्णय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राज्य सरकारने घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडन येथे शिक्षण घेत असताना १९२१-२२ या काळात लंडन शहरातील येथे वास्तव्यास होते. ही वास्तू लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने विकत घेतली आहे. त्यांच्यामार्फतच या ठिकाणी बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व वास्तूच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने आक्षेप घेतला होता आणि स्मारक बनविण्याची विनंती फेटाळली होती. त्या विरुद्ध महाराष्ट्र सरकारने ब्रिटन सरकारने तक्रार केली होती. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी ब्रिटन सरकारच्या शहर नियोजन विभागाचे निरीक्षक केरी विल्यम्स यांच्या नेतृत्वाखालील समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीपुढे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनातर्फे आपल्या वकिलांमार्फत बाजू मांडण्यात आली. आता या वास्तूचे निवासी क्षेत्रातून म्यूझीयम डी १ मध्ये रूपांतर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच या वास्तूमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास परवानगी देण्यात आली आहे. संरक्षक भिंत, रेलिंग व दिव्यांगांसाठी लिफ्टचे काम करण्यासही परवानगी


नवी दिल्ली येथे मोदी सरकारने डॉ. बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभे केले आहे.

देण्यात आली आहे. तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने (London Borough of Camden) उपस्थित केलेल्या आक्षेपांवर उत्तर देताना असे सांगण्यात आले की ज्यावेळी ही वास्तू विकत घेतली, त्यावेळी ती अत्यंत जीर्ण अवस्थेत होती. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तिचे तातडीने नूतनीकरण करणे आवश्यक होते. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वतीने लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांनी कार्यवाही केली आहे. हे काम निवासी म्हणून करण्यात आले आहे. लंडन येथील क्रीन कौन्सिलकडे आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. या स्मारकामुळे जगभरातील आंबेडकर अनुयायांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

### दिल्ली येथील डॉ. आंबेडकर राष्ट्रीय स्मारक

२६ अलीपूर रोड, दिल्ली येथील राष्ट्रीय स्मारक आहे. हे स्मारक बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित आहे. हे बाबासाहेबांचे निवासस्थान होते व येथेच त्यांचे इ.स. १९५६ मध्ये महापरिनिर्वाण झाले होते. त्यामुळे याला महापरिनिर्वाण भूमी किंवा महापरिनिर्वाण स्थळ म्हणूनही ओळखले जाते. १३ एप्रिल २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. स्मारकातील इमारतीची रचना उघडलेल्या भारतीय संविधानाच्या पुस्तकाप्रमाणे असून हा आकार ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक आहे. स्मारकासाठी सुमारे २०० कोटी रुपये एवढा खर्च करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधीत पंचतीर्थ म्हणजेच पाच स्थळांचा विकास करण्याचं केंद्र आणि स्थानिक राज्य


मध्य प्रदेशमधील महू या डॉ.बाबासाहेबांच्या जन्मगावी मोदी सरकारने उभे केलेले स्मारक.

सरकारनं ठरवलं आहे, त्यापैकी हे स्मारक एक आहे.

- स्मारकाच्या प्रवेशद्वारावर ११ मीटर उंचीचा अशोक स्तंभ उभारण्यात आला आहे.
- या स्मारकाच्या इमारतीची रचना उघडलेल्या पुस्तकासारखी आहे, आणि हे पुस्तक भारताचे संविधान आहे. ही रचना ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक आहे.
- स्मारक परिसरात प्रदर्शन व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्यात आली आहे.
- बाबासाहेबांच्या कार्याची माहिती देणे, प्रदर्शनाचे आयोजन इत्यादी कार्यक्रम होतात.
- या ठिकाणी बाबासाहेबांचा १२ फुट उंचीचा कांस्य धातूचा एक भव्य पुतळा, डिजीटल प्रदर्शनी, गौतम बुद्धांची ध्यानस्थ मुर्ती आहे.
- थ्री डी इफेक्टद्वारे बाबासाहेब प्रत्यक्ष आपले विचार मांडताना दिसतात.

### मुंबईतील इंदू मिल येथील स्मारक

दादर येथील चैत्यभूमीलगत असलेल्या इंदू मिलच्या जागेवर हे स्मारक उभे राहत आहे. ही जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी मिळावी, अशी मागणी आंबेडकरी जनतेची १९८९ पासून होती. त्यानंतर सर्व मागण्या पूर्ण झाल्यानंतर २०१५ साली स्मारकाचे काम सुरु झाले.




मुंबईत इंदू मिलच्या जागेवर साकार होत असलेल्या स्मारकामध्ये डॉ. आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभारला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमीपूजन झाले. पुढील वर्षी २०२४ मध्ये हे काम पूर्ण होणार आहे. या स्मारकाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा. स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४५० फूट उंचीचा पुतळा उभारण्यात येणारआहे. या स्मारकात विहार, विपश्यना केंद्र, ग्रंथालय, माहिती केंद्र, सभागृह, वाहनतळ, तिकीटघर, सामान कक्ष, स्वच्छतागृह, नियंत्रण कक्ष, उपाहारगृह आणि अन्य सुविधांचा उपलब्ध करण्यात येणार आहेत. ४.८ हेक्टर क्षेत्रफळ जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक साकारत असून या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १०९० कोटी रुपये आहे. प्रकल्पाचे प्रवेशद्वार, इमारत, व्याख्यान वर्ग, ग्रंथालय, बेसमेंटमधील वाहनतळाचे ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे. इंदू मिलच्या परिसरातील तळ्याची सुधारणा आणि सुशोभिकरण करून महाडच्या चवदार तळ्याची प्रतिकृती साकारली जाणार आहे. स्मारक इमारतीच्या पाठ पीठामध्ये बौद्ध वास्तूरचना शैलीतील घुमट, चैत्यसभागृह, संग्रहालय असेल. तसेच यात प्रदर्शन भरविण्याची सोय असेल. पुतळ्याच्या पायथ्याशी पोहोचण्यासाठी पादपीठात ६ मीटर रुंदीचा आंतरिक आणि बाह्य चक्राकार मार्ग प्रस्तावित आहे. यामध्ये विविध कलाकृती साकारल्या जाणार आहेत. १००० नागरिक बसण्याच्या क्षमतेच्या प्रेक्षागृहाची उभारणी होणार आहे.

**अंबडवे (जिल्हा रत्नागिरी)–** या गावातच डॉ. भीमरावांचे आंबेडकर हे नाव झाले. त्यामुळे डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात या गावाला महत्वाचे स्थान आहे. या गावाचाही केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून विकास करण्यात येत आहे.

**दीक्षाभूमी (नागपूर)–** नागपूरच्या दीक्षाभूमीवर जागतिक दर्जाचे स्मारक उभारण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी आयोजित धर्मांतर सोहळ्यात लाखो जनसमुदायासोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. देशभरातील बौद्ध धर्मांतर सोहळा दिवस हा 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा करतात. दीक्षाभूमीच्या विकासासाठी राज्य सरकारने २०० कोटी रुपये एवढ्या निधीची तरतूद केली आहे. पुढील वर्षी धम्मचक्र प्रवर्तनदिनापर्यंत येथील स्मारकाचे काम पूर्ण करण्यात येईल. दीक्षाभूमीच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये स्तुप विस्तारीकरण, सीमा भिंत, गेट कॉम्प्लेक्स व वॉच टॉवर, पार्किंगसाठी बेसमेंट, शौचालये, पिण्याचे पाणी, कार्यक्रम व्यासपीठ, जलसाठा टाकी, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प इत्यादी विकासकामांचा समावेश आहे. यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अधिकृत एजेंसी म्हणून मान्यता देण्यात आली आहे. दीक्षाभूमीच्या २२.८० एकर परिसराचा विकास जागतिक दर्जाचा करण्यात येणार आहे. ■

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतून जनतेचा स्पष्ट संदेश



(श्री. शिवप्रकाश हे भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री आहेत.)

● शिवप्रकाश

> सावरकर, गांधी, आंबेडकर यांचे एकमेकांशी मतभेद असतील; पण या साऱ्याच महान राष्ट्रनिर्मात्यांनी परस्परांचा अनादर केलेला नाही. आज मात्र काँग्रेस पक्ष, देशाच्या गृहमंत्र्यांची विधानेसुद्धा विपर्यस्तपणे पाहातो आहे आणि आंबेडकरांचे केवळ नाव वापरून राजकारण करतो आहे!

**नुकत्याच** पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमताने विजय मिळवला. महायुतीला ४९.८% मते आणि २३४ जागा मिळाल्या. महायुतीतील भारतीय जनता पार्टीने १४८ जागा लढवल्या आणि त्यापैकी १३२ जागा जिंकल्या. हा स्ट्राईक रेट ९० टक्के इतका आहे. भारतीय जनता पार्टीचे हे आतापर्यंतचे सर्वात मोठे यश आहे. महाराष्ट्रातील या घवघवीत यशामुळे लोकप्रिय नेते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीचे निकाल पहाता, विधानसभेचे निकालही आपल्याच बाजूचे असतील असा विश्वास महाविकास आघाडीला होता. लोकसभेच्या वेळी महाविकास आघाडीला ३० जागा मिळाल्या होत्या तर १५१ विधानसभा मतदारसंघांमध्ये आघाडी मिळाली होती. मात्र आता विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेला हा जनादेश महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव टाकणारा आहे हे नक्की. त्याचबरोबर देशातील जनतेलाही अनेक अर्थांनी धडे देणारा ठरला.

महाराष्ट्र हे देशातील असे एक राज्य आहे, ज्याने विषमतेने भरलेल्या अनेक कुप्रथा मोडून काढत एकोपा असलेला समाज निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र ही विविध प्रकारचे भक्ती मार्ग सांगणाऱ्या संतांची भूमी आहे. मुघल साम्राज्याला धूळ चारणाऱ्या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्रापासूनच संपूर्ण देशाला स्वराज्य आणि स्वधर्म रक्षणाची प्रेरणा दिली. समतेवर आधारीत समाज घडविण्याच्या चळवळीत महत्वाची भूमिका बजावणारे महात्मा ज्योतिबा फुले, स्त्री शिक्षणाला वाहून घेतलेल्या सावित्रिबाई फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांचीही कर्मभूमी हेच राज्य आहे. दलितोद्धाराच्या चळवळीचे महानायक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही प्रारंभिक कर्मभूमी महाराष्ट्रच आहे. क्रांतिकारी आणि अहिंसक अशा दोन्ही मार्गांनी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या महापुरुषांची ही भूमी आहे. थोर क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लोकमान्य टिळक यांनी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील तरुणांना प्रेरणा देण्याचे कार्य केले आहे. या सर्व महापुरुषांची प्रेरणा आत्मसात करुन, देशभक्ती आणि हिंदुत्वाचे संस्कार एकवटून तयार झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची जन्मभूमी नागपूरही याच राज्यात आहे, जो सज्जनशक्तीच्या आस्थेचे केंद्र बनून केवळ आपल्या देशालाच नाही तर संपूर्ण जगाला प्रकाशमान करत आहे.

मात्र सत्तेच्या लालसेपायी महाराष्ट्रातील काही नेते सातत्याने या सर्व महापुरुषांना नाकारण्याचे काम करत आहेत. स्वतःला जातीयवादी राजकारणाचा केंद्रबिंदू




मानणारे लोक छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित महापुरुषांचे अस्तित्व नाकारण्याचे काम करत आहेत. इतिहासाच्या पुस्तकांतून शिवाजी महाराजांना दरोडेखोर म्हणण्यासारखे सिद्धांत मांडण्याची हिंमत ते करत आहेत. शिवाजी महाराजांना घडवण्यात समर्थ रामदास स्वामी आणि दादाजी कोंडदेव यांचे काहीच योगदान नव्हते, असा सिद्धांत मांडण्याचाही प्रयत्न सातत्याने केला जात आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या देशभक्तीवर शंका उपस्थित करणे ही जणू परंपराच झाली आहे. महापुरुषांकडे जातीच्या चष्म्यातून पहाणे आणि याच आधारावर जातीभेद निर्माण करुन मते मिळवणे हे राजकीय कौशल्याचे उदाहरण ठरत आहे. महाराष्ट्रातील जनतेने या जातीद्वेषाच्या राजकारणाला नाकारत जातीपातींच्या पलिकडे जाऊन सर्वांचा समान सन्मान राखणाऱ्यांना यावेळी पाठिंबा दिला आहे.

देशात विकास आणि समृद्ध वारशांच्या संवर्धनाचे मोलाचे कार्य एकाचवेळी करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्यासाठी काही अतिरेकी विचारसरणीचे घटक २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत इंडी आघाडीच्या समर्थनार्थ उभे राहीले होते. त्यांची हीच मानसिकता 'व्होट जिहाद'च्या रूपाने समोर आली. महाराष्ट्रातील धुळे लोकसभा मतदारसंघासह देशातील अनेक लोकसभा मतदारसंघांतील निकालांतून याचा प्रत्यय आला आहे. धुळे लोकसभा मतदारसंघात सहापैकी पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाचा उमेदवार जवळपास १,९०,००० मतांनी आघाडीवर होता केवळ मालेगाव मध्य या मुस्लीमबहुल मतदारसंघात व्होट जिहादमुळे तो १,९४,००० मतांनी पिछाडीवर गेला. त्यामुळे अगदी शेवटच्या क्षणी अवघ्या जवळपास चार हजार मतांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा विजय झाला. सर्वांगीण, सर्वसमावेशक विकासाचे ध्येय ठेवून केंद्र आणि राज्य सरकारकडून सर्व घटकांना सगळ्या सुविधा मिळाल्यानंतरही मतदानाची ही पद्धत लोकशाही आणि संविधानासाठी अत्यंत चुकीची आहे. ही मानसिकता लोकशाहीला कमकुवत बनवेल. याच मानसिकतेला तीव्र विरोध करत महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी व्होट जिहादविरोधात मतांचे धर्मयुद्ध पुकारले होते. व्होट जिहादी मानसिकतेच्या या लोकांनी उत्तर मध्य मुंबईमधील लोकसभेचे उमेदवार उज्वल निकम यांना पराभूत करण्याची आणि मराठा आरक्षण आंदोलनात आघाडीवर असलेल्या नेत्यांशी हातमिळवणी करून भाजपाला पराभूत करण्याचा विडा उचलला होता. आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन महाविकास आघाडीसोबत मतांची



सौदेबाजी याच मानसिकतेचे लोक करत होते, ज्यामध्ये २०१२ ते २०२४ दरम्यान राज्यात झालेल्या दंगलीतील मुस्लिमांविरोधातील खटले काढून घ्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या राष्ट्रवादी संघटनांवर बंदी घालणे इत्यादी मागण्यांचा समावेश होता. व्होट जिहादच्या माध्यमातून निवडणुका जिंकून सत्तेपर्यंत पोहचणारे हे लोक बांगलादेशात होत असलेल्या हिंदू नरसंहारावर चकार शब्दही काढत नाहीत. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महायुतीच्या बाजूने दिलेले कौल म्हणजे त्यांना दिलेले चोख प्रत्युत्तर आहे.

कोरी पाने असलेले संविधान हातात घेऊन संविधान वाचविण्याची हाकाटी करत बिनबुडाचा नरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न काँग्रेससहीत इंडी आघाडीने केला. भाजपा सत्तेत आली तर संविधान आणि आरक्षण संपुष्टात येईल, अशी भीती जनमानसात पसरवण्याचा प्रयत्न विरोधक करत राहिले. लोकसभा निवडणुकीत याला काही अंशी यश मिळाल्याचेही दिसून आले. ज्यांनी स्वतः निवडून आलेली सरकारे बरखास्त करुन घटनेचा गळा घोटला आहे, ज्यांना बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचारात लोकशाही दिसत आहे, ज्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना निवडणूक जिंकू दिली नाही, ज्यांच्या एकाधिकारशाहीच्या मानसिकतेमुळे बाबासाहेब आंबेडकरांना मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्यास भाग पाडले, ज्यांनी बाबासाहेबांना योग्य आदर दिला नाही, अशा लोकांना महाराष्ट्रातील जनतेने अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव असलेल्या ५४ पैकी ४२ जागा महायुतीला देऊन या खोट्या नरेटिव्हला सडेतोड उत्तर दिले आहे. स्वतः सत्तेत असताना ज्यांनी मराठा समाजाच्या विकासासाठी कोणतेही धोरण आखले नाही, त्यांनी भाजपा सरकार सत्तेवर आल्यावर समाजाला विभाजनाच्या मार्गावर नेऊन आंदोलन उभे करण्याचा आणि पडद्यामागून त्याला पाठींबा देऊन विविध समाजांमध्ये भिंती उभ्या करण्याचा हीन प्रयत्न केला. या शक्तींना, मराठा समाजाचे वर्चस्व असलेल्या बहुतांश जागा महायुतीला देऊन महाराष्ट्रातील जनतेने सणसणीत चपराक लगावली आहे.

या देशविघातक शक्ती महाराष्ट्रात विषाची बीजे पेरुन समाजात द्वेष निर्माण करण्याचे काम दीर्घकाळापासून करत होत्या. भीमा-कोरेगाव हिंसाचार प्रकरणात शहरी नक्षलवाद्यांचा देशात दंगल घडवून सरकार उलथवून टाकण्याचा डाव उघड झाला आहे. सवर्ण-दलित संघर्ष निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता. 'हिंदुस्तान टाईम्स'च्या वृत्तानुसार, मुस्लिम सेवक संघाद्वारे संघटीत केलेल्या शेकडो स्वयंसेवी संस्था यंदाच्या निवडणुकीत महायुतीला पराभूत करण्याच्या प्रयत्नात होत्या. महायुतीचा पराभव करण्याचे स्वप्न उराशी बाळगून परदेशी अनुदान मिळणारे अनेक गट व व्यक्ती महाराष्ट्रात सक्रीय झाल्या होत्या. या सर्व पार्श्वभूमीवर महायुतीचा हा विजय म्हणजे विरोधकांना दिलेले चोख प्रत्युत्तर आहे.

विरोधकांकडे महाराष्ट्राच्या विकासाची 'ना नीती होती ना नियत' होती. नकारात्मकतेच्या भावनेतून जनतेत भ्रम पसरवून त्यांची दिशाभूल करून महाराष्ट्राच्या विजयाची स्वप्ने ते पाहत होते. हीच मंडळी विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर नेहमीप्रमाणे आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडत आहेत.

हा जनादेश म्हणजे त्या सर्व नकारात्मक शक्तींवर सकारात्मकतेचा विजय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली डबल इंजिन सरकारच्या सहाय्याने महाराष्ट्राच्या विकासासाठी कटीबद्ध असलेल्या आणि जनतेच्या कसोटीवर खऱ्या उतरलेल्या नेतृत्वावरील जनतेचा विश्वास, महायुतीचे संघटीत प्रयत्न, राष्ट्रवादी शक्तींचे सहकार्य, भाजप आणि महायुतीच्या असंख्य कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम यामुळे हा विजय साध्य झाला आहे. विकास, सुरक्षा आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाला समर्पित सरकारची निवड केल्याबद्दल महाराष्ट्रातील जनतेचे शतशः आभार. ■


# अटलजी, हा देश तुमच्याप्रति सदैव कृतज्ञ राहील!

● पंतप्रधान नरेंद्र मोदी


> २५ डिसेंबर २०२४. माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयीजी यांची शंभरावी जयंती. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना भारताचे स्थित्यंतर घडवून आणणारे शिल्पकार म्हणून आपला देश अटलजींप्रति सदैव कृतज्ञ राहील.

**पंतप्रधान** म्हणून त्यांनी १९९८ मध्ये शपथ घेतली तेव्हा आपला देश राजकीय अस्थिरतेच्या गर्तेतून बाहेर पडत होता. नऊ वर्षात लोकसभेच्या चार निवडणुका झाल्या होत्या. जनतेचा संयम सुटत चालला होता. अटलजींनी स्थिर आणि प्रभावी सरकार देऊन हा प्रवाह उलट दिशेने वळवत परिस्थिती पालटवली. अटलजी स्वतः सामान्य पण सत्शील कुटुंबातून आले असल्यामुळे, सामान्य नागरिकांना करावा लागणारा संघर्ष आणि परिणामकारक राज्यकारभारातून घडवून आणता येऊ शकणाऱ्या परिवर्तनाची ताकद, ते जाणून होते.

अनेक क्षेत्रांमध्ये अटलजींच्या नेतृत्वाचा दीर्घकालीन प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कारकिर्दीत भारताने माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार आणि संपर्क व्यवस्थेच्या जगात मोठी झेप घेतली. भारतातील मुख्य ठिकाणे चहू दिशांनी जोडणाऱ्या सुवर्ण चतुष्कोन या महामार्ग प्रकल्पाची आठवण आजही महत्त्वाची आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजनेसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक दळणवळण वाढवण्याचे वाजपेयी सरकारचे प्रयत्नही तितकेच उल्लेखनीय होते. देशातील सर्वांना विशेषतः गरीब आणि वंचित घटकांना आधुनिक शिक्षण उपलब्ध असेल, अशा आधुनिक भारताची उभारणी करण्याचे स्वप्न अटलजींनी पाहिले होते. त्यांच्या सरकारने अनेक आर्थिक सुधारणा करून भारताच्या आर्थिक उत्थानाचाही पाया रचला.



१९९८च्या उन्हाळ्यातली घटना, अटलजींचे सरकार नुकतेच सत्तेवर आले होते आणि ११ मे रोजी भारताने ऑपरेशन शक्ती या नावाने ओळखली जाणारी पोखरण अणुचाचणी केली. या अणुचाचणीने भारताच्या वैज्ञानिक समुदायाच्या सामर्थ्याची वेगळी ओळख जगासमोर आणली. भारताने अणुचाचणी केल्याने संपूर्ण जग थक्क झाले. काही देशांनी याबद्दल विनाकारण संतापाचेदेखील प्रदर्शन केले. यावेळी एखाद्या सामान्य नेत्याने कच खाल्ली असती, पण अटलजींनी मागे पाहिले नाही. भारत खंबीर राहिला आणि





दोन दिवसांनी १३ मे रोजी आणखी चाचण्या करत सरकारने आपला निर्धार दाखवून दिला.

भारतीय राजकारणातील आघाड्यांची व्याख्या बदलणाऱ्या रालोआचे अध्यक्षपद अटलजींनी भूषवले. विरोधकांच्या टीकेला आपल्या स्वतःच्या शैलीने आणि विद्वत्तापूर्ण संवादांनी बोथट करण्यात अटलजी माहीर होते. त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा बराच काळ त्यांनी विरोधी बाकांवर व्यतीत केला होता, पण त्यांनी कधीही कोणाविरोधात मनात कडवटपणा ठेवला नाही.

संधिसाधू डावपेचांचा वापर करून सत्ता मिळवण्याची हाव अटलजींना कधीही नव्हती. १९९६ मध्ये घोडेबाजार आणि घाणेरड्या राजकारणाच्या मार्गावर चालण्यापेक्षा त्यांनी राजीनामा देणे योग्य मानले. १९९९ मध्ये केवळ एका मताने त्यांच्या सरकारचा पराभव झाला. अशा प्रकारच्या अनैतिक राजकारणाला आव्हान देण्याचा सल्ला त्यांना अनेकांनी दिला, मात्र त्यांनी नियमांना अनुसरून वाटचाल करण्याचा निर्णय घेतला. शेवटी जनतेनेच त्यांना भव्य बहुमताने पुन्हा एकदा सत्तेवर आणले.



भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभांमध्ये हिंदी भाषेत भाषण करणारे ते पहिले भारतीय नेते ठरले. त्यांच्या या कृतीतून भारताचा वारसा आणि अस्मितेबद्दलचा त्यांचा अपार अभिमान दिसून येतो.

भाजपच्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचे तर हे भाग्यच, की आम्हाला अटलजींसारख्या व्यक्तिमत्त्वाकडून शिकता आले, त्यांना जाणून घेता आले, त्यांच्याशी संवाद साधता आला. लालकृष्ण अडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्यासारख्या दिग्गज सहकाऱ्यांच्या सोबतीने त्यांनी पक्षाला त्याच्या स्थापनेपासूनच आकार दिला, खडतर आव्हाने, अपयश आणि विजयाच्या काळात दिशा दाखवली. जेव्हा जेव्हा विचारधारा आणि सत्ता यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली, त्या त्या वेळी त्यांनी कायमच विचारधारेचीच निवड केली.

**(पूर्व प्रसिद्धी दै.लोकमत)**

नववर्षात मोदी सरकारची शेतकऱ्यांना भेट

# पीक विमा योजनेचा विस्तार, डीएपी खतांसाठी अनुदान, ५० किलोची डीएपी बॅग १,३५० रु. लाच मिळणार

**केंद्र** सरकारने नववर्षाच्या पहिल्याच दिवशी शेतकरी हिताचे निर्णय घेऊन पीकविमा योजनेचा विस्तार केला आहे. त्याचप्रमाणे डीएपी खतांसाठीदेखील अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. बैठकीतील निर्णयांची माहिती केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकारपरिषदेत दिली. ते म्हणाले, सरकारने पीक विमा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून त्यात आणखी ४ कोटी शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीच्या वेळी आर्थिक मदत मिळू शकेल. सरकारने डीएपी खतावर ३,८५० कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांना ५० किलोची डीएपी बॅग १,३५० रुपयांना मिळत राहील. आंतरराष्ट्रीय बाजारात डीएपीचे भाव वाढले असतानाही शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी एकूण ६९,५१५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, आंतरराष्ट्रीय बाजारात डीएपीच्या किमती सातत्याने वाढत आहेत. या वाढीचा बोजा शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी सरकारने वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, डीएपी खतांसाठी अतिरिक्त अनुदान देण्याबाबत आणखी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पीएम मोदींनी एक वेळचे विशेष पॅकेज दिले आहे. शेतकऱ्यांना ५० किलोची डीएपीची पिशवी १,३५० रुपयांना मिळणार आहे. आजच्या जगात, भू-राजकीय तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे जो काही अतिरिक्त भार असेल, तो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार उचलेल. हे विशेष एकरकमी पॅकेज हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे आणि यातून सरकारची शेतकऱ्यांप्रती असलेली बांधिलकी दिसून येते. या संपूर्ण पॅकेजची एकूण किंमत अंदाजे ३,८५० कोटी रुपये असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री फसल विमा योजना आणि पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना २०२५-२६ पर्यंत सुरु ठेवायला मंजुरी दिली. योजनेच्या २०२१-२२ ते २०२५-२६ या काळासाठी एकूण रु.६९,५१५.७१ कोटी खर्चालाही केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयामुळे २०२५-२६ पर्यंत देशभरातील शेतकऱ्यांना आकस्मिक नैसर्गिक आपत्तींमुळे उद्भवणाऱ्या जोखमीपासून पिकाचे संरक्षण करायला मदत होईल. या व्यतिरिक्त, योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी, केंद्रीय मंत्रिमंडळाने ८२४.७७ कोटी रुपयांच्या निधीसह नवोन्मेश आणि तंत्रज्ञानासाठी (FIT) निधी स्थापन करायला मंजुरी दिली, ज्यामुळे पारदर्शकता वाढेल, तसेच दाव्यांची मोजणी आणि त्याची पूर्तता होण्याचे प्रमाण वाढेल. YES-TECH, WINDS ई. योजनेंतर्गत तंत्रज्ञान विषयक उपक्रमांना निधी उपलब्ध करण्यासाठी तसेच संशोधन आणि विकास अभ्यासासाठी या निधीचा वापर केला जाईल. तंत्रज्ञानाचा आधारित उत्पन्न अंदाज प्रणाली (YES-TECH), किमान ३०% महत्व देत, रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्नाचा अंदाज वर्तवते. ९ प्रमुख राज्यांनी सध्या (आंध्रप्रदेश, आसाम, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू आणि कर्नाटक) सध्या या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी केली आहे. इतर राज्येही वेगाने त्यामध्ये सहभागी होत आहेत. YES-TECH च्या व्यापक अंमलबजावणीसह, पीक कापणीशी निगडीत प्रयोग आणि संबंधित समस्या टप्प्याटप्प्याने दूर केल्या जातील. YES-TECH अंतर्गत २०२३-२४ साठी दाव्यांची मोजणी आणि पूर्तता करण्यात आली आहे. मध्य प्रदेशने १००% तंत्रज्ञान आधारित उत्पादन अंदाज पद्धतीचा अवलंब केला आहे. हवामान माहिती आणि नेटवर्क डेटा प्रणाली (WINDS) अंतर्गत स्वयंचलित हवामान केंद्रे (WS) ब्लॉक स्तरावर तर स्वयंचलित पर्जन्यमापक (RGs) पंचायत स्तरावर स्थापित करण्याची कल्पना आहे. ■

# भाजपा सदस्य नोंदणी अभियानाला नागपूर येथे प्रारंभ






## मिस्ड कॉलद्वारे व्हा भाजपाचे सदस्य

**भाजपाचे सदस्यत्व मिळवण्यासाठी ८८०००००२०२४ या मोबाइल क्रमांकावर मिस्ड कॉल दिल्यानंतर एक मेसेज प्राप्त होईल, ज्यामध्ये सदस्यत्व नोंदणी क्रमांक दिला जाईल.**

**भारतीय** जनता पार्टीच्या प्रदेश सदस्यता नोंदणी अभियानाला नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ झाला. यावेळी भाजपा राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, पंकजा मुंडे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पक्ष सदस्यत्व दिले. या अभियानात ५ जानेवारी २०२५ रोजी राज्यातील भाजपाचे सर्व मंत्री, खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष सहभागी होणार आहेत.

राज्यात या अभियानात १ कोटी ५१ लाख एवढी विक्रमी प्राथमिक सदस्य नोंदणी करण्याचा संकल्प पक्षातर्फे करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भाजपाच्या देशव्यापी सदस्यता अभियानाला प्रारंभ झाला. ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत्या त्या राज्यात निवडणुकीनंतर सदस्यता अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्यात सदस्यता नोंदणी अभियान सुरु करण्यात आले आहे.




उत्तर अहिल्यानगर– उपस्थिती– आ. मोनिका राजळे, जिल्हा सरचिटणीस नितीन दिनकर, सिताराम भांगरे, नितीन कापसे, भाऊसाहेब वाकचौरे, श्रीराज डेरे, ऋषिकेश शेटे, डॉ. बाळासाहेब कोलते, राजेंद्र दराडे, रामकृष्ण आगळे, अशोक टेकने, मनोज पारखे, शंकर कंनगरे, नानासाहेब डौले, ज्ञानेश्वर पागिरे, आदिनाथ पटारे, रामेश्वर गाडेकर, डॉ. विद्या कोलते आदी.




पुणे– उपस्थिती– खा. धनंजय महाडिक, महानगराध्यक्ष धीरज घाटे, पश्चिम महाराष्ट्राचे समन्वयक प्रभारी जगदीश मुळीक, शहर समन्वयक राघवेंद्र मानकर, ॲड. प्रसन्नदादा जगताप आदी.




पनवेल– उपस्थिती– आ. प्रशांत ठाकूर, आ. संजय केळकर, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महेंद्र घरत, दीपक बेहरे, नितीन पाटील आदी.

# सदस्य नोंदणी अभियान




नाशिक– उपस्थिती– माजी केंद्रीय मंत्री डॉ.भारती पवार, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, विजय साने, माजी आमदार बाळासाहेब सानप, माजी महापौर सतिश कुलकर्णी, सरचिटणीस सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, श्याम बडोदे, रोहिणी नायडू, गिरीष पालवे, प्रदिप पेशकार, गणेश कांबळे, शांताराम घंटे, सुनिल देसाई,भास्कर घोडेकर, भगवान काकड, अविनाश पाटील आदी.




मालेगाव– उपस्थिती– माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, उत्तर महाराष्ट्राचे सह संयोजक डॉ. राधेश्याम बजोरिया, ज्येष्ठ नेते सुरेश निकम, जिल्हाध्यक्ष प्रा. निलेश कचवे, दादा जाधव, लकी गिल, भरत पोफळे, नंदु तात्या सोयगावकर, नाना मराठे, कमलेश निकम, धनंजय पवार, साहेबराव सोनवणे, पुष्पलता पाटील, सुरेखा भुसे, मंगेश खैरनार आदी.



वसई–विरार– उपस्थिती– खा. डॉ.हेमंत विष्णु सवरा, आ. राजन नाईक, आ.स्नेहा पंडित–दुबे, जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, राणी द्विवेदी, सदस्य नोंदणी संयोजक विश्वास सावंत, जोगेंद्र प्रसाद चौबे, हरेंद्र पाटील आदी.



धुळे– उपस्थिती– माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. अमोल जावळे, आ.अनुप अग्रवाल, आ. काशीराम पावरा, धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, धुळे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, प्रतिभा चौधरी, प्रदीप कर्पे, हिरामण गवळी, डॉ. सुशील महाजन, किशोर सिंघवी, संदीप बैसाणे, ओम अग्रवाल, भारती माळी आदी.




कोल्हापूर– उपस्थिती– खा. धनंजय महाडिक, आ. सुधीरदादा गाडगीळ, आ. अमल महाडिक, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, राहुल चिकोडे, प्रदेश सचिव महेश जाधव, अशोक देसाई, गायत्री राऊत, डॉ. राजवर्धन, अप्पा लाड, राजू मोरे, शैलेश पाटील, उमा इंगळे, माधुती नकाते, धनश्री तोडकर, विजयसिंह खाडे–पाटील, भरत काळे, दिग्विजय कालेकर, अमर साठे, मंगला निपाणीकर, संगीता खाडे आदी.




इचलकरंजी– उपस्थिती– प्रदेश उपाध्यक्ष सुरेशराव हाळवणकर, आ. राहुल आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे, शहर अध्यक्ष पैलवान अमृतमामा भोसले, विजय भोजे, शशिकांत मोहिते, जिल्हा सरचिटणीस शहाजी भोसले, ज्येष्ठ नेते मिश्रीलाल जाजू, अशोक स्वामी, पांडुरंग म्हातुगडे, अश्विनीताई कुबडगे, जयेश बुगड, प्रकाश दत्तवाडे, बाळासाहेब कलागते आदी.




परभणी येथील आंबेडकरी चळवळीतील नेते विजय वाकोडे यांच्या अकाली निधनानंतर आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी वाकोडे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन या कठीण प्रसंगात त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.



कांदिवली (मुंबई)- ८०० नागरिकांना पाच लाख मोफत उपचाराचे आयुष्मान भारत कार्डचे वितरण- उपस्थिती- आ. योगेश सागर, नगरसेवक बाळा तावडे, नगरसेवक लीना देहरकर, गिरीधर साळुंके, नवनीत दुबे आदी.

मुंबई- माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त खिचडी वाटप- उपस्थिती- प्रदेश प्रवक्ते माजी आमदार अतुल शाह, रमेश मेहता, मुकेश गावकर, सुशील राणे, राजा पाटील, बळवंत गायकवाड, अनिल मामा सुर्वे, वीरेंद्र मिस्त्री, दुलाराम चौधरी, वैशाली दमानिया, स्नेहल ठुबे आदी.






माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जन्मदिनानिमित्त इंटरनॅशनल क्यूबर ग्रॅण्ड मास्टर अफान कुट्टी याने क्यूबचा वापर करून तयार केलेले अटलजींचे चित्र. प्रदेश कार्यालयात अटलजींना आदरांजली वाहण्यात आली. उपस्थिती– प्रदेश कार्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, प्रदेश कार्यालय सह प्रभारी सुमंत घैसास, कार्यालय सहसचिव भरत राऊत, सदाशिव चौधरी, ज्येष्ठ नेते अतुल शाह, शैलेजा सामंत आदी.









सोशल मीडिया मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी नागपूर येथील कार्यक्रमात संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत सोशल मीडिया पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक केले. यावेळी प्रकाश गाडे, सरदार लक्की सिंग चावला, साईनाथ शिरपुरे, आनंद खजांची, निखील भामरे, जयदीप कुलकर्णी आदी.










रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे विस्तारक समीक्षा वर्गाचे आयोजन- उपस्थिती- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे. यावेळी राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय संघटक व्ही. सतीश, प्रदेश कार्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, ज्येष्ठ नेते रघुनाथ कुलकर्णी, विस्तारक योजनेचे संयोजक शैलेंद्र दळवी, संजय कौडगे, भरत अमदापुरे आदी.



RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp



नवी दिल्ली– संघटन पर्व अभियान– उपस्थिती– राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय संघटन मंत्री बी.एल.संतोष, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, महसूल मंत्री व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे.





राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी महाराष्ट्रातील अभूतपूर्व यशाबद्दल प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांचे अभिनंदन केले.

**प्रति,**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com